म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें.
विषय क्का. वाङ्मय
दा. क्र. ६६४२

# संगीत संवाद


लेखक

**वि. ज. कामत**, एस्. टी. सी.


श्री. कृ. ता. मंत्री,
बी.ए., बी. टी., एल्. सी. पी.(लंडन), डिप्.एड्.(एडि.),
स्पेशल लिटरसी ऑफिसर
ह्यांचा ' परिचय '


२ री आवृत्ति : फेब्रुवारी १९५८



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ६६६२ नों. दि ..........
वि. बाल वा क्र. ..........

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई


मूल्य रु. १.२०

सर्व हक्क प्रकाशकाधीन

प्रथमावृत्ति : १९४१
पुनर्मुद्रण : १९४४, १९५८

मुद्रक
श्रीनिकेतन ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
कर्नाटक हाउस
चिराबाजार
मुंबई २

प्रकाशक
श्रीनिकेतन ढवळे
केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
बनाम हॉल लेन
गिरगांव, मुंबई ४

# परिचय

श्रीयुत विठ्ठलराव कामत ह्यांनीं आपल्या "संगीत संवादां" स मीं परिचय लिहावा असा आग्रह धरला व प्रकाशक श्री. केशवराव ढवळेही माझा नकार लेखकास कळवावयास तयार होईनात; म्हणून नाइलाजानें हा छोटासा परिचय लिहिणें मला भाग पडत आहे. खरें पाहातां कोणत्याही साहित्यकृतीचा परिचय एखाद्या साहित्यिकानें करून देणें हेंच उचित. मी साहित्यिक नाहीं. गुंतागुंतीच्या विविध यंत्रांनीं चालणाऱ्या व अनेक शास्त्रज्ञांनीं नियंत्रित केलेल्या एखाद्या भव्य कारखान्यांत ज्याप्रमाणें एखाद्या सामान्य माणसानें केव्हां अनभिज्ञतेच्या आश्चर्यानें तर केव्हां नावीन्याच्या आनंदानें एका दालनांतून दुसऱ्या दालनांत भरभर फिरावें, अशाच प्रकारचा वाङ्मयाच्या विविध व विराट स्वरूपाशीं माझा संबंध आहे. अशा स्थितींत श्री. कामत ह्यांनीं आपल्या वाङ्मयकलाकृतीला मीं परिचय लिहावा असा आग्रह कां धरला ह्याचें मला एकच कारण दिसतें. "संवाद" पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाल्यावर लेखकाच्या प्रतिभेचा दर्जा, कला व तिचा प्रचलित तंत्रानुरूप परिपोष इत्यादि संवादांच्या वाङ्मयिक गुणावगुणांची चर्चा नामवंत साहित्यिकांकडून होईलच. कोणतेंही पुस्तक अगर काव्य हें कलावंतापेक्षां बहुजनसमाजाच्चाच अधिक उपयोगी असतें. तेव्हां आपल्या गद्य व संगीत संवादांसंबंधानें सामान्य माणसाचें मत काय आहे हें समजून घ्यावें असाच लेखक-कवीचा हेतु असावा असें वाटतें. मीं तरी ह्याच भूमिकेनें प्रस्तुत पुस्तकास परिचय लिहिण्याचें, नाखुषीनें कां होईना, कबूल केलें.

प्रस्तुत पुस्तकामध्यें सोळा निरनिराळ्या विषयांवर लिहिलेले संवाद ग्रथित केले आहेत. विषय सर्वांच्या परिचयाचे व अनेक वेळां शाळा, कॉलेजें, चर्चा-मंडळें आणि वर्तमानपत्रें ह्यांतून चर्चिलेले असेच आहेत. आत्मोद्धार, चहापानाचे अनिष्ट परिणाम, अभ्यास कसा करावा, बालदिनाचें रहस्य, स्त्रियांचें शिक्षण व कार्यक्षेत्र, अस्पृश्यता-निर्मूलन, बालवीर-शिक्षण, ग्रामोद्धार, सुशिक्षितांची बेकारी, समाजसेवा, इत्यादि विषयांत नावीन्य नाहीं ही गोष्ट खरी, तथापि श्रीयुत कामत ह्यांनीं त्यांच्यावरील नवीन पोषाखाची सजावट मोठ्या कल्पकतेनें केली आहे. त्यामुळें वाचक संवाद वाचीत असतां किंवा त्यांतील पदें गुणगुणत असतां नावीन्याच्या उत्सुकतेनें रमून जातो. कोणताही विषय निबंधपद्धतीनें

मांडण्यापेक्षां तो संभाषणपद्धतीनें मांडल्यास अधिक आकर्षक व परिणामकारक होतो. म्हणून जुने व परिचित विषय पुनरावृत्त करतांना दुसऱ्या पद्धतीचा अवलंब करून श्रीयुत कामत ह्यांनीं वाचकांच्या मनाची पकड घेण्याचें एक मोठें साधन काबीज केलें आहे असें मला वाटतें व त्याच्या जोडीला मधून मधून लौकिक चालींवर लहान लहान गीतें घातल्यामुळें संवाद अधिक आकर्षक झाले आहेत. शाळांतील वरच्या वर्गांतील मुलांमुलींना तर ते फारच आवडतील असें मला वाटतें. श्रीयुत कामत हे एक कसलेले व सहृदय शिक्षक आहेत. शाळांच्या तपासणी-अधिकाऱ्याचेंही त्यांनीं काम केलेलें आहे. त्यामुळें अनेक तरुण विद्यार्थीविद्यार्थिनींच्या स्वाभाविक वृत्ति, भावना व आवडीनिवडी ह्यांची त्यांना माहिती आहे व ह्या माहितीचा त्यांनीं प्रस्तुत संवादांत मोठ्या कुशलतेनें व कल्पकतेनें उपयोग केला आहे ह्याचा वाचकाला अनुभव येतो. विशेषेंकरून अभ्यास, बालदिन, बालवीरशिक्षण व वीर तानाजी ह्या संवादांत लेखकाच्या बालमनोज्ञानाचें प्रत्यंतर प्रामुख्यानें दिसून येतें.

सर्वच संवाद प्रचारस्वरूपाचे आहेत. पण त्यांत प्रतिपादलेलीं तत्त्वें व त्यांची प्रतिपादनपद्धति हीं मतभेदापेक्षां मतैक्य उत्पन्न करणारीं आहेत. संवाद सार्वजनिक कार्यकर्ते, समाजसेवक इत्यादि सामान्य प्रौढांनाही उपयोगी पडण्यासारखे आहेत. तथापि शालेय विद्यार्थ्यांना त्यांचा अधिक उपयोग होणार आहे. त्या दृष्टीनें लेखकानें स्वीकारलेली पद्धति योग्य आहे. सध्याच्या विद्यालयीन शिक्षणपद्धतीचा एकांगीपणा सर्वश्रुत आहे. परंतु असलेल्या परिस्थितींत तो अधिक जीवनोपयोगी कसा करतां येईल हें "ज्ञानोपासनेबरोबरच विद्यार्थ्यांनीं बलोपासना, शीलोपासना व ईश्वरोपासना करावी" असें प्रतिपादून सिद्ध केलें आहे. त्याचप्रमाणें चरखा व दुसरे लहानलहान हस्तव्यवसाय इत्यादि कार्यक्रम सध्याच्या शिक्षणपद्धतींत सुद्धा साध्य होतील हें श्रीयुत कामत ह्यांनीं दाखविलें आहे. ह्या सर्व संवादांतून उच्च दर्जाची नीतिमत्ता, देशप्रीति, सेवाव्रत, उद्यमशीलता, समता इत्यादि राष्ट्रोद्धाराला लागणाऱ्या गुणांचा विकास चांगल्या रीतीनें दाखविला आहे.

ह्या सर्व संवादांत "जीवनोद्यान" व "बेकार" ह्या संवादांत लेखकानें आपल्या कविकल्पनेची व नाट्यकलेची चुणूक दाखविली आहे. जीवनोद्यानगीत हें उच्च दर्जाच्या कवितेंत गणतां येण्यासारखें आहे. त्याप्रमाणें शेवटचा संवाद 'स्वदेशी' ह्यामधील सहकारितेचें 'निज देशाच्या उद्योगाची इ०" हें गीत वाचकांच्या मनांत बंधुप्रेम व राष्ट्रप्रीति जागृत केल्याशिवाय राहणार नाहीं. अशीं आणखीही गीतें आहेत तीं प्रचारकाव्याचे नमुने म्हणून दाखवितां येतील.

विस्तारभयास्तव थोड्यांचाच ओझरता उल्लेख करतां येईल. "वीरांगनां" तील "निर्मल आवडे मना", "बालदिन-संवादां" तील "बालदिन आज मजेचा आला", "ग्रामोद्धारां" तील "सेविन देशबंधुंना", "अस्पृश्यता-निर्मूलन" मधील "अस्पृश्याची कहाणी", "बालवीर-शिक्षण" मधील "तया सुजनातें इ०" हीं गीतें मुलांनीं अहर्निश म्हणण्यासारखीं आहेत. गद्य भागांत सुद्धा कांहीं कांहीं संवाद फारच उत्कृष्ट आहेत. "अस्पृश्यता-निर्मूलन"-मधील "हे महात्माजी" इ० अथवा "ह्या वसंतऋतूमध्यें" इ० वरील सुमतीचीं भाषणें वाचकांचें मन हालविल्याशिवाय राहाणार नाहींत.

कांहीं संवादांच्या शेवटीं लेखक कवीनें स्फुट पद्यें घातलीं आहेत. तीं श्रीयुत कामत ह्यांची अद्याप अज्ञात असलेली उच्च काव्यशक्ति दर्शवितात. मौज, पतंग, भावमीलन, गंमत, हीं पद्यें सुंदर नाहींत असें कोण म्हणेल ?

मागें म्हटल्याप्रमाणें ह्या "संवादां" त लेखकानें कोणतेही नवे सिद्धान्त काढले नाहींत किंवा नवीन पद्धतीही प्रतिपादन केलेली नाहीं. पण "वर्धायोजना", चरखा, गृहव्यवसाय, जनसेवा, ग्रामोद्धार, इत्यादि प्रचलित विषय संकलित रीतीनें, आकर्षक भाषाशलीनें व आटपशीर आकारांत मांडले आहेत, हेंच त्यांच्या उच्च लेखनकौशल्याचें व काव्यप्रतिभेचें लक्षण आहे. वस्तुस्थिति कादंबरीच्या रम्यतेंत मांडणें हेंच बुद्धिमान् लेखकांचें वैशिष्ट्य आहे.

ह्या संवादांमध्यें माझ्या मताप्रमाणें एक न्यून आढळतें. तें हें कीं, पुष्कळ ठिकाणीं संवादक व्यक्तींचीं भाषणें गंभीर स्वरूपाचीं वाटतात. विनोदाचा जवळ-जवळ अभावच आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या हातांत हें पुस्तक बहुशः पडणार आहे. तेव्हां निर्दोष आनंद उत्पन्न होईल अशा लिखाणाच्या अगर प्रसंगांच्या अभावीं पुस्तकाच्या उपयुक्ततेचे एक दोन गुण कमी झाले असावे असें वाटतें.

श्रीयुत कामत हे एक उत्तम लेखक व उच्च दर्जाचे कवि आहेत हें मला गेल्या ८।१० वर्षांपासून माहीत आहे. तथापि वाङ्मयक्षेत्रांत त्यांची अद्याप फारशी प्रसिद्धि झाली नाहीं ही खेदाची गोष्ट आहे. पण मला विश्वास वाटतो कीं, ह्या त्यांच्या साहित्यकृतीनें त्यांना प्रसिद्धीचा मार्ग दाखविला पाहिजे. लवकरच त्यांना वाङ्मयक्षेत्रांतील त्यांचें स्थान लाभो अशी इच्छा प्रदर्शित करून हा परिचय पुरा करतों.

कृ. ता. मंत्री

# हृ द्ग त

प्रस्तुत 'संगीत–संवाद' हें सुमन रसिकांच्या हातीं देण्याचा सुयोग ईशकृपेनें आज येत आहे. त्याच्या आस्वादानें रसिकांना किंचित् जरी आनंद झाला, तरी माझ्या श्रमांचें सार्थक झालें असें मी समजेन.

संवाद प्रचलित विषयांवर असून गीतांच्या चालीही आधुनिक, सोप्या व हृदयंगम अशाच घेतलेल्या आहेत. त्यामुळें मुलांमुलींना संमेलन-प्रसंगीं ह्या पुस्तकाचा चांगलाच उपयोग होऊन मनोरंजन व विचारजागृति हे दोनही हेतु साध्य होतील.

माझे मित्र श्री. का. रा. पालवणकर, संपादक 'खेळगडी' ह्यांनीं बाल–वाङ्मय–लेखन–प्रोत्साहन दिलें व श्री. गोपाळराव जोशी, बी. ए. (टिळक), एस्. टी. सी. ह्यांनीं श्री. फडणीस ह्यांच्या मध्यस्थीनें प्रकाशक–परिचय करून दिला; म्हणूनच इतक्या लवकर 'संगीत–संवाद' जनसेवेला सादर झालेले दिसत आहेत, त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें.

श्रीयुत केशव भिकाजी ढवळे, प्रकाशक, ह्यांनीं प्रथम परिचयापासूनच इतकी आपुलकीची भावना निर्माण केली व प्रकाशनाचें कार्य इतक्या कळकळीनें व आस्थेवाईकपणानें केलें कीं, त्याबद्दल जितकी कृतज्ञता व्यक्त करावी तितकी थोडीच होणार आहे. तेव्हां हीच भावना सदैव ठेवावी अशी मी त्यांना विनंती करतों व त्यांचे हार्दिक आभार मानतों.

श्री. कृ. ता. ऊर्फ भाऊसाहेब मंत्री, बी. ए., बी. टी., डिप्. एड्., स्पेशल लिटरसी ऑफिसर, मुंबई, ह्यांनीं माझ्या विनंतीला मान देऊन इतक्या चिमुकल्या पुस्तकाला परिचय लिहून तें रसिकांच्या पुढें आणण्याचें कार्य केलें ह्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणीच आहें. ते कुलाबा जिल्ह्यांत शाळाधिकारी असतांना त्यांच्या विद्वत्ता-प्रचुर सहवासाचा लाभ प्रस्तुत लेखकास वारंवार झालेला असल्यामुळेंच त्यांनीं प्रस्तावना लिहावी ही मनीषा होती व तीं त्यांनीं सुपूर्त केली, त्याबद्दल त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतों.

शेवटीं जगन्नियंत्या प्रभूनें अशीच लेखनस्फूर्ति देऊन अखंड वाङ्मय-सेवा करण्याची ह्या बालकाला संधि द्यावी अशी त्याची प्रार्थना करून 'जीवनोद्यान'–विहार करण्यास वाचकांना विनंती करतों.

वि. ज. कामत

# अनुक्रमणिका


पाहुण्यांचें स्वागत ८
१ जीवनोद्यान ९
गोड जीवन १५
२ आत्मोद्धार १६
मौज २०
३ चहाचें स्तोम २१
पतंग २५
४ अभ्यास २६
५ वीरांगना ३०
भावमीलन ३३
६ स्त्री-शिक्षणाची आवश्यकता ३४
७ बालदिन-संवाद ३९
आमची बाग ४३
८ ग्रामोद्धार ४४
९ स्त्रियांचें कार्यक्षेत्र ४९
१० यशोमार्ग ५१
गंमत ५५
११ अस्पृश्यता-निर्मूलन ५६
१२ बालवीर-शिक्षण ६३
१३ समाज-सेवा ६९
१४ वीरवर तानाजी ७६
१५ बेकार ८०
१६ स्वदेशी ९१
पुष्पहार-समपण, आभार-प्रदर्शन ९५
आभार, अंतिमगीत, निरोपगीत ९६

# पा हु ण्यां चें स्वा ग त

— १ —

[ चाल : रुसलासी हरी कां बरें ....... ]

किति करूं तरी स्वागता ॥
मन भरे प्रमोदें आतां ॥ ध्रु० ॥
चिमुकले अम्ही बालक
तुम्ही थोर करा कौतुक
वितरुनी कृपा अविरता ॥ १ ॥
अधिकार लाभला महा
विद्वान प्रथिततर आहां
ही शोभत महनीयता ॥ २ ॥

— २ —

[ चाल : डोळे हे जुल्मि गडे ...... ]

स्वागत हें स्वजनांचें ।
करित अम्ही प्रेमभरें ॥ ध्रु० ॥
पाहुनियां आपणांस ।
आनंदें हृदय भरे ॥
गोड अशा सहवासें ।
गोड भाव हृदयिं स्फुरे ॥
अन्योन्यां पटत असे ।
प्रेम–भाव एकसरें ॥
अनुपम किति प्रेम नटे
नच शब्दें तें उमटे
नेत्र–जलें सहज पटे
अंतरिं किति प्रेम झरे ॥ १ ॥

— १ —

# जीवनोद्यान

[ **पात्रें** : १ पुष्पलता, २ कुसुम, ३ कमला, ४ सुमन, ५ सुगन्धा ]

( उद्यानांत विहार करीत असतां प्रस्तुत संवाद घडला आहे. )

**पुष्पलता** : अहाहा ! काय छान बाग ही ! जिकडे तिकडे फुलंच फुलं दिसताहेत !

**कुसुम** : तूं बोलून चालून पुष्पलता, तुला फुलांशिवाय काय दिसायचं आहे ! अग, पुष्प म्हणजे फूल आणि लता म्हणजे वेल. ज्या वेलीवर फुलंच फुलं आहेत अशीच वेल नव्हेस का तूं !

**कमला** : शर्थ आहे बाई ह्या कुसुमपुढें ! लागलींच तिनें पुष्पलतेच्या अंगावरच फुलं चिकटवलीं ! म्हणजे उद्यानांत फुलं असतात म्हणण्यापेक्षां माणसाच्या अंगावरच फुलं असतात असं सिद्ध करणार कीं काय ही !

**पुष्पलता** : अग, पण मी तिच्या पलीकडची आहें ! मी जर पुष्पलता तर ती आहे कुसुम ! कुसुम म्हणजे मूर्तिमंत फूल — माझ्या अंगावर फुलं असतील, पण ती ? — ती तर फूलच आहे !

[ इतक्यांत सुमन व सुगन्धा त्याच बागेंत पूर्वसंकेताप्रमाणें फिरावयास येतात. ]

**सुमन** : खासा गुंगारा दिलांत ! आम्हांला वाटलं आम्हांला हाक मारून मग तुम्ही ह्या बंडगार्डनमध्यें फिरायला याल ; पण पहात्यें तों तुम्ही पुढेंच झटकलांत !

**पुष्पलता** : घरून निसटायचं म्हणजे सर्वांनाच साधी गोष्ट नसते ! सगळ्याच मुली सारख्या मिळून जाऊं लागल्या म्हणजे, मुलींचा ताफाच्या ताफा कुठें चालला आहे, असें लोक सहजच म्हणतात व मग

आयांनाही वाटूं लागतं, मुलींना फिरायला पाठवूं नये म्हणून ! हें जरासं चुकवावं म्हणून ही आम्हीं युक्ति योजली.

**कुसुम :** सुमन, तूंच आतां न्याय कर ! मला कशी ह्यांनीं अगदीं ही करून टाकली आहे ! मीं पुष्पलतेला ‘ फुलांची वल्लरी ’ म्हटल्याबरोबर तिनें मला फूल करून टाकलं कीं !

**सुमन :** पण मी कसा बाई हा न्याय निवडूं ! माझं नांव सुमन, आणि त्याचाही अर्थ फूलच ! हा डावही माझ्यावरच उलटायचा ! त्यापेक्षां ह्या सुगन्धेनेंच आपला सर्वांचा न्याय करावा.

**सुगन्धा :** कांहीं होवो; जेव्हां पाहावं तेव्हां तुम्ही आपल्या माझ्या पाठीमागें ! का मी आपली मोठी आहें म्हणून ? का सुमन माझी आहे म्हणून ? काय ग सुमन ? तूं आपली माझ्यावरच कां ढकलतेस ?

**सुमन :** सुगन्धे ! आमच्यांत तूंच नाहीं का मोठी ? न्याय हा मोठ्यांनींच निवडायचा असतो !

**सुगन्धा :** बरं बाई ! काय पुष्पलते, तुझं काय म्हणणं आहे सांग पाहूं.

**पुष्पलता :** मीं आपलं नुसतं म्हटलं, ‘ अहाहा ! काय छान बाग ही ! जिकडे तिकडे फुलंच फुलं दिसताहेत ! ’ तेवढ्यावरून हा सगळा वाद ; दुसरं काय सुगन्धे !

**सुगन्धा :** अहो, इकडे पाहा, सगळ्याजणी इकडे पाहा — मी न्यायाधीश ह्या नात्यानें बोलत्यें आहें बरं का !

**पुष्पलता :** माझ्याकडचा न्याय पाहिजे हं !

**कुसुम :** पण खरा असेल तरच तो न्याय !

**कमला :** न्यायाधीश कीं न्यायाधीशा ?

**सुमन :** अगदीं चांगला विचार करून न्याय दे बरं का ! म्हणजे तो अगदीं बरोबर होईल !

**सुगन्धा :** हं ! गप्प बसा ; मधें अगदीं बोलूं नका ; तोंडावर बोटं ठेवा बरं का !

**पुष्पलता :** म्हणजे ? कांहीं अद्‌भुत सांगणार आहेस वाटतं !

**सुगन्धा :** अद्‌भुत नव्हे – पण आपल्या बाई सांगतात ना ? त्याचप्रमाणें – हां अगदीं चूप ! ( जरा गंभीर होऊन ) असं पाहा, ही जशी इथें बाग दिसत आहे, तशीच आपल्या जीविताची – आपल्या जीवनाची बागच आहे म्हणा ना ! ‘ जीवनोद्यान ’ असा कांहींसा शब्द कवीनें योजलेला मला आठवतो, आपलं जीवन हें उद्यानाप्रमाणेंच नाहीं का ?

**पुष्पलता :** हं ! मग ह्यांत न्याय तो काय दिलास व तो कुणाकडचा दिलास ?

**सुगन्धा :** हा न्याय एकीकडचा नव्हे सगळ्यांकडचाच आहे. तुम्ही साऱ्याजणी ह्या बागेंतील लतांप्रमाणेंच नाहीं का ? मग तुम्हांला लता म्हटलं, फूल म्हटलं, किंवा सुमन म्हटलं तर तें सार्थच नव्हे का ?

**सुमन :** पण काय ग सुगन्धे ! हें उद्यान नेहमींच रम्य दिसत असतं, हसतं, डुलतं, झुलतं, तसं कुठें आपलं जीवन आहे ? आपलं जीवन इतकं आनंदी असतं तर काय मौज झाली असती !

**सुगन्धा :** कां बरं ? जरा विचार कर सुमन ! परमेश्वरानें तुला खरोखरच चांगलं मन दिलं आहे. आपल्या दुःखांपैकीं कितीतरी दुःखं आपलीं आपणच उत्पन्न करतों. ह्या वृक्षलतांनीं ग्रीष्म ऋतूंत कडक उन्हांत उभं राहून कडकडीत तपश्चर्या केली, म्हणूनच ना परमेश्वरानें त्यांच्यावर पर्जन्यरूपी अमृताचा वर्षाव केला ! तशी आपण काय अशी तपश्चर्या करतों, कीं त्यामुळें आपणांवर सतत ईश्वरकृपा असावी ! कोणत्याही कार्यांत प्रथम आपण ईशकृपा संपादन केली पाहिजे. तरच तो आपणांस कृपेचं जीवन देईल. मला तें त्या दिवसाचं पावसाचं गाणं किती आवडलं आहे म्हणून सांगूं !

**कमला :** अग, मग म्हणस ना तें! ह्या उद्यानांत गाणीं म्हणायचीं टाकून हीं लांब लांब व्याख्यानं कशाला देत आहेस?

**कुसुम :** म्हणच तर बाई! मला गाणीं फार आवडतात.

**सुगन्धा :** माझं तर आवडतंच पद आहे तें!

### पद

[ चाल: ये झणिं नन्दनन्दना ]

**पाऊस काय हा पडे**
**ईश-कृपा किंवा ही**
**अमृतमयी ये इकडे ॥ ध्रु० ॥**
**वठलेल्या सृष्टीतें**
**नवजीवन ही देते**
**अहा! दिव्य अवनी ही**
**हासत ना चोहकड ? ॥ १ ॥**

**सुमन :** अहाहा! हे देवा! ह्या रम्य सृष्टीप्रमाणें आमच्यावरही आपल्या कृपामृताचा वर्षाव कर! तुझ्या कृपेनें हें उद्यान किती रमणीय दिसत आहे बरं!

### पद

[ चाल: सखे मी मुरारी ]

**अहाहा! फुलांचा नवा ताटवा ॥**
**किती हासवी मोहवी या जिवां ॥ ध्रु० ॥**
**किती रम्य जाइ, जुई, मोगरे**
**गुलाबी तसे गुच्छ हे हासरे**
**अहा! मोहवीती सुगंधें हवा ॥ १ ॥**

**पुष्पलता :** होय, परमेश्वर-कृपेनेंच आपलं जीवन ह्या उद्यानाप्रमाणें आनंदी होणार आहे; एरवीं आपल्या माणसांच्या हातांत काय आहे?

**सुगन्धा :** असं कसं म्हणतेस? पाऊस पडणं जरी आपल्या हातीं नसलं तरी ही बाग स्वच्छ, व्यवस्थित, निर्मल, मनोहर, सुंदर दिसत आहे ती कशामुळें बरं? माणसाच्या प्रयत्नानेंच ना? आपल्या जीवनाचे बागवान आपणच आहों. तेव्हां तें प्रयत्नानें – उद्योगानें – असंच राखलं पाहिजे.

**पुष्पलता :** म्हणजे आपण उद्योग केला पाहिजे हेंच ना?

**सुगन्धा :** हो, उद्योग तर पाहिजेच. पण त्याशिवाय अन्य सद्गुणांचीही जोपासना केली पाहिजे. अंतर्बाह्य शुद्धता तर प्रथम पाहिजे. तसंच ह्या लतांना जसं वळण द्यावं लागतं, तद्वत् शिक्षणानें योग्य ज्ञान संपादन करून आपण आपल्या जीवनाला वळण लावलं पाहिजे.

**कुसुम :** हं! हं! समजलं! आपण ह्या उद्यानासारखं चहूंबाजूंनीं चांगलं झालं पाहिजे हेंच ना तुझं म्हणणं? म्हणजे आपल्या कीर्तीचा सुगंध चहूंकडे पसरेल!

**कमला :** ह्या उद्यानावरून जीवनाकडे बरीच कीं ग सरलीस! आपलं जीवन हें उद्यानच कसं, तें समजलं आतां!

**सुगन्धा :** नुसतं समजलं म्हणूं नकोस कमल, ही कल्पना तुझ्या हृदयाला भिडली पाहिजे. तशी ती भिडली का?

**कमला :** खरंच सांगूं का? (ऐटींत बसते व गाणें म्हणूं लागते.)

## पद

[ चाल : सखे मी मुरारी ]

**अहा! रम्य देवा! वगीचा किती!**
**फुले हा डुले मोद अती ॥ ध्रु० ॥**

**तयाच्या परी जीवनोद्यान हें**
**कृपेनें प्रभूच्या करूं या स्वयें**
**अहा जागृती जाहली संप्रती ॥ १ ॥**

**सुगन्धा :** अहाहा ! किती गोड गाणं हें ! ह्या पोरीनें हां हां म्हणतां माझ्या मनांतली कल्पना कशी अचुक उचलली ! मला वाटतं आतां तुम्हांला न्याय मिळाला ! खरं ना ?

**सुमन :** जीवनोद्यानाची कल्पना तर आम्हांला बरोबर कळली. आपलं ह्या जगांतलं जीवन सुखमय व आनंदमय होण्याकरितां आपण ह्या उद्यानासारखंच होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपण मनांत आणलं तर आपलं जीवनोद्यान आपणांस किती सुंदर व सुखमय करतां येईल !

**सुगन्धा :** खरंच, आपलं जीवन जर आपण उद्यानाप्रमाणें राखलं, तर त्यांत स्वर्गीय नंदनवनापेक्षां अधिक आनंद आहे. मला जीवनोद्यान कसं वाटतं म्हणून सांगूं !

## जीवनोद्यान — गीत

[ चाल : भारतीं सृष्टीचें सौंदर्य खेळे ]

**जीवन-उद्यान सुंदर भासे ॥**
**सद्गुण-सुमांहीं सारखें हासे ॥ ध्रु० ॥**
**सत्कीर्ति-सौगंध जेथ दरवळे**
**आनंद-मरंद संतत गळे**
**कोमल पराग जेथ प्रेमाचे**
**भावना फुलवी, हृदय नाचे** १
**नव-रसयुत रम्य निर्झरी**
**सारख्या नाचती आंत बाहेरी**
**वृक्ष-वल्लरींचा संघ बहरे**
**प्रेम अंतरांत एक विहरे** २
**युव-युवतींच्या गोड भावना**
**कारंजीं उडती जणुं हीं नाना**
**सप्तरंग धनु तयांत दिसे**
**प्रेमाचा सेतु हा काय विलसे** ३

कोकिल-कूजन रम्य हें चाले
जीवन-संगीत काय हा बोले
कविराज गीत सृष्टि-सखीचे
प्रेमानें गातसे काय गोडसें ४

राष्ट्र-भक्तियुत मंगल वारे
वाहती प्रेमाचे अखंड झरे
पवित्र यशाचीं मधुर फळें
परेश-कृपेनें उद्यान डोले ५

**सूचना** — सुगन्धा साभिनय हें पद गाते व तिच्या मैत्रिणी त्यांतील ध्रुवपद मात्र म्हणून अभिनय.करतात.

---

## गोड जीवन

[ चाल : योग्य न प्रेम वर्णना- ]

जीवन गोड लाभलें
देवानें जगतीं या
आपणांस अर्पियलें ॥ ध्रु० ॥

मति सुंदर ही दिधली
मानवता ही असली
भरत-भूमि - कर्मभूमि
सर्व गमे हें वहिलें ॥ १ ॥

# आ त्मो द्धा र

[ **पात्रें :** वसंत, बलवंत, अनंत, जयंत ]

**वसंत :** हं ! बलवंत ! किती खोडकर पोर आहेस ! मला पाहिलं म्हणजे एखादी धडांकी दिल्याशिवाय पुढें जावं असं तुला वाटतच नाहीं का ? तुला आपल्या बलाचा गर्व झाला आहे वाटतं ?

**बलवंत :** असं नाहीं रे वसंत ! पण तुझा पोकळ दिमाख पाहिला, रिकामी पोषाखाची ऐट पाहिली व आरोग्याची हेळसांड आणि चिडखोर वृत्ति पाहिली म्हणजे जरा खोडी काढल्यावांचून माझ्याच्यानें राहावतच नाहीं !

**वसंत :** नाहीं, असं नाहीं ! मी नेहमीं पाहातों आहें, परवां तर बोलतां बोलतां तूं आपल्या अस्तन्या वर केल्यास आणि अगदीं भीषण रूप दाखवलंस. पण इतक्यांत गुरुजी आले म्हणून सगळं थांबलं !

[ अनंत व जयंत हे प्रवेश करतात. ]

**अनंत :** केव्हांही तुम्हांला पाहा, साधं बोलणं हें कधीं नसायचंच ! एकेरीवर येऊन मग पक्षोपपक्ष चालायचा !

**वसंत :** अनंत, माझी केव्हांही चूक नसते ! हा बलवंत नेहमींच माझ्या खोड्या करतो आणि मग माझ्यावरच शह ठेवतो ह्याला काय म्हणावं ?

**अनंत :** ह्याला म्हणावं तुझा बावळटपणा ! वसंत, कदाचित् तूं अभ्यासांत सर्वांच्या पुढें असशील, परंतु शरीराची जोपासना तूं कधीं तरी करतोस का ? आरोग्याची हेळसांड केल्यानें तुझं शरीर किती नाजुक झालेलं आहे व वृत्तीही किती चिडखोर बनली आहे !

**वसंत :** अगदीं खरं ! ही गोष्ट मला एकदम कबूल केली पाहिजे. अरे, पण उपजतच माझी प्रकृति अशक्त नाहीं का ? मग उगाच मला तरी दोष कशाला नि माझा तरी त्यांत गुन्हा काय ?

**जयंत :** आतां मात्र मला मध्यें तोंड घातल्याशिवाय राहावत नाहीं. अरे, उपजतच प्रकृति कसली घेऊन बसलास ! राममूर्ति, सँडो हे मल्ल जगद्विख्यात होऊन गेले, ते काय उपजतच मल्ल होते असं तुला वाटतं ? आहार–विहार ह्यांत नियमितपणा नि योग्य व्यायाम ह्यांनींच आरोग्य लाभतं. उगाच भलत्याच कल्पनांना मनांत थारा देणं इष्ट नाहीं. तेव्हां ज्ञानार्जन करतांना, ज्ञानाची उपासना करतांना, ज्ञानोपासना करतांना म्हणेस ना, बलोपासना जरूर केली पाहिजे. बुद्धीबरोबर शरीरही चांगलं तयार केलं पाहिजे.

**वसंत :** आतां मला बोलायला तुम्हीं जागाच ठेवली नाहीं ! माझ्या प्रगल्भ बुद्धीला काटक शरीराची जोड देणं इष्ट आहे ह्यांत शंका नाहीं.

**बलवंत :** हं ! पण एवढ्यानं कुठं भागणार आहे ? तुझी ही चिडखोर वृत्ति जायला मनही कणखर असलं पाहिजे. मन कणखर असायला त्यालाही वळण लागलं पाहिजे.

**वसंत :** बलवंत, तूं आपलं कांहीं तरी नवीन काढून माझा अपमान करतोस ! माझं मन चांगलं नाहीं आणि तुमचीं मनं चांगलीं आहेत, असंच कीं नाहीं तुमचं म्हणणं ?

**बलवंत :** छे ! छे ! छे ! असं नाहीं ! आम्हांलासुद्धा अजून पुष्कळ शिकायचं आहे. ज्ञानोपासना करतां करतां जशी बलोपासना करावी लागते, त्याचप्रमाणं हळुहळू वळण लावून 'शीलोपासना'ही करावी लागते. आणि नीति-मार्गाचं आचरण करून चांगल्या संवयी लावून

घेतल्या म्हणजे हळुहळू शील तयार होतं. आम्ही आपणांला सर्वस्वीं चांगलं म्हणवून घेतों, असं तूं समजूं नकोस !

**अनंत :** थोर पुरुषांच्या ठिकाणीं सच्छील हें नेहमींच दिसून येतं, किंबहुना शीलानंच त्यांना थोरपणा आलेला असतो.

**जयंत :** शील हेंच खरं भूषण होय ! शीलानंच मनुष्याला खरी शोभा येते. म्हणून 'शीलोपासना' अवश्य केली पाहिजे. ईश्वरनिष्ठा, सदाचरण, सत्यभाषण, वडील जनांविषयीं आदर, स्वदेशाभिमान, स्वधर्माभिमान, स्वाभिमान, सेवा–तत्परता, इत्यादि सद्गुण जर आंगीं असतील, तर तो मनुष्य शीलवंत होत असतो. 'शीलं परं भूषणम्' म्हटलं आहे तें अगदीं सार्थ आहे.

**वसंत :** होय, हें तर मला अगदीं पटतं ! माझ्या स्वभावांतील कांहीं दोष तरी सहज मला दिसत आहेत नि ते मी दूर करीन. आपण परस्परांच्या शील-संवर्धनाकरतां नेहमींच जपत जाऊं.

**जयंत :** शीलाची थोरवी किती सांगूं नि किती नको असं मला होऊन गेलं आहे ! आमच्या आचार्यांच्या शिकवणीनं शीलाचं मोल मला केव्हांच समजलं आहे.

## पद

['सखे मी मुरारि' ह्या चालीवर]

**अलंकार हा शील लोकीं खरा ॥**
**जसा कोंदणीं दिव्य शोभे हिरा ॥ ध्रु० ॥**

**जगीं मोल त्याचें न कोणी करी**
**जणों मानवी अंश हा ईश्वरी**
**म्हणोनी सदा श्रेष्ठ शीला वरा ॥ १ ॥**

**वसंत :** अहाहा ! जयंत, तुझं शीलावरील प्रेम मीं बोलून दाखवलं पाहिजे असं नाहीं ! आपले गुरुजीसुद्धा तुझी वारंवार स्तुति करीत असतात. शीलोपासना मी कधींही विसरणार नाहीं !

**अनंत :** सर्व खरं ! ज्ञानोपासना, बलोपासना, शीलोपासना, ह्या उपासना प्रत्येकानं केल्याच पाहिजेत; मग तो बाल असो वा तरुण असो, गरीब असो वा श्रीमंत असो, स्त्री असो वा पुरुष असो. पण ह्या सर्वांचं अधिष्ठान कुठं आहे ह्याचा आपण कधीं तरी विचार केला आहे का ?

**जयंत :** म्हणजे ? कां नाहीं ? तुला आतां काय म्हणायचं आहे हें मीं ताडलं !

**वसंत :** हं ! पण सांगितल्याशिवाय मला कधीं काय समजलं आहे !

**बलवंत :** अरे, मला सांगितल्याशिवाय समजतं आणि तुला सांगूनही समजत नाहीं, हाच तुझ्या माझ्यांत फरक, दुसरं काय ?

**जयंत :** हं, बलवंत ! ह्यापुढें तूं वसंतला चिडवण्याचं सोडून दे. त्यानं पुष्कळशा गोष्टी आतां कबूल केल्या असून तो आतां आपल्या वृत्तीशीं समरस झाला आहे. त्याचा एकांगीपणा जाऊन खरा विद्यार्थी व्हावं असं त्याला वाटूं लागलं आहे !

**वसंत :** मी आतां चिडणारच नाहीं ! पण जयंत, ह्या सर्वांना कसलं अधिष्ठान पाहिजे असं तूं म्हणतोस ?

**जयंत :** अरे, परमेश्वराचं ! ईश्वरोपासना ही अगदीं अवश्य आहे. ज्ञानोपासना, बलोपासना, शीलोपासना व ईश्वरोपासना हें उपासना-चतुष्टय जर आपण लक्षांत ठेवून त्याप्रमाणें वागलों तरच आपला 'आत्मोद्धार' होणार आणि आत्मोद्धार हेंच खरं शिक्षणाचं ध्येय आहे. आपली मायभूमि जी आज दीन आहे, त्याचं कारण खरं शिक्षण

संपादन करून आपण तिची सेवा करीत नाहीं हेंच. तर मग आपण एकाच ध्येयानें प्रेरित होऊन आत्मोद्धार होण्याकरितां त्या परमेश्वराची प्रार्थना करूं या.

## आत्मोद्धार

[ चाल : भूषण संसारा ]

आत्मोद्धार करूं स्वबलें ॥
जगतीं परवश माय उद्धरूं ॥ ध्रु० ॥

ज्ञान-शील-बल-संयुत होउनी
दीन-दयाघन ईश स्मरूं ॥ १ ॥

---

## मौज

[ चाल : झिम्म्याची ]

मौज वाटे ही । मौज वाटे ही ॥
आनंदानें खेळायाची मौज वाटे ही ॥ ध्रु० ॥

बाळपण खेळासाठीं । झाल्या आमुच्या गांठी भेटी ॥
ठेवूं चला प्रेम-दृष्टि । मौज वाटे ही ॥ १ ॥

गमतीची आमुची शाळा । होती इथें भगिनी गोळा ॥
लागे त्यांचा किती लळा । मौज वाटे ही ॥ २ ॥

ज्ञान-फुलें चला वेंचूं । आणि हासूं खेळूं नाचूं ॥
शील-सूत्रीं गुंफायचा । मौज वाटे ही ॥ ३ ॥

करूं त्यांचा गोड हार । छान छान सुकुमार ॥
वाहूं शारदेच्या पायीं । मौज वाटे ही ॥ ४ ॥

---

# चहाचें स्तोम

[ चहा घेण्याच्या तयारींत श्यामला, विमला, सरला गाणें म्हणत आहेत. ]

[ चाल : सखे मी मुरारि ]

**अहा ! या चहाची किती थोरवी**
**न वर्णू शके कोणताही कवी ॥ ध्रु० ॥**
**जरा एकदां लागली लज्जत**
**तयाची सुटेना कधीं संगत**
**सदा गोडि वाटे तयाची नवी ॥ १ ॥**

**श्यामला :** अहाहा ! ह्या चहाची ह्या जगांत किती चहा आहे ! किती घेऊं आणि कुठें ठेवूं असं मला झालं आहे !

**विमला :** मी आतां किती बरं थकल्यें होतें, पण ह्याला पाहिल्या-बरोबर माझा थकवा अगदीं पार निघून गेला !

**सरला :** मला तर वाटतं हा इहलोकींचं अमृतच आहे ! कारण डॉक्टर लोक आसन्नमरण झालेल्या रोग्यांनाही चहा घेण्याची मुभा देतात ! त्यांना वाटतं न जाणो, कदाचित् ह्या अमृतानें रोगी उतरला तर उतरला !

[ इतक्यांत कमला, लीला व सुशीला भेटावयास येतात. ]

**कमला :** आज मोकळा दिवस आहे, त्याचा उपयोग चहा पिण्यांत करायचा वाटतं ? श्यामले, हा चहा दिसण्यांतच कसा दिसतो बाई ! नको ग ऽ ऽ ह्याची संगत !

**श्यामला :** कां कमले, असं कां म्हणतेस ? जगांत मोल दिसण्यांत का आहे ? रूपापेक्षां गुणांनींच अधिक मोठेपणा मिळत असतो !

**लीला :** मी आपली थोडा घेईन हं चहा !

**कमला :** हं, लीले, त्या दिवशीं स्वदेशीवर व्याख्यान ऐकलं, त्या दिवसापासून आपलं काय ठरलं आहे, कीं जेणेंकरून स्वदेशीला उत्तेजन मिळेल असं करायचं. मग ?

**विमला :** चहा परदेशी असता तर मीं कधींच घेतला नसता ! हा खास निलगिरी देशी चहा असून स्वदेशी साखरेंत स्वदेशी हातांनीं तयार केला आहे व त्यामुळेंच मी घेत्यें, समजलीस ? कसं झालं तरी मी विमल आहें !

**सरला :** मी आपली सरळ स्वभावाची ! विमल घेत असत्ये म्हणून मी घेत्यें एवढंच !

**लीला :** म्हणजे थोडा घेण्यास आतां कांहींच हरकत नाहीं !

**सुशीला :** स्वदेशीच्या आड येत नाहीं ना ? मग मीही थोडासा घेणार !

**कमला :** म्हणजे सर्व जणी माझ्यापासून फुटून निघालां वाटतं ! पण तुम्ही कांहींही म्हणा, मला तर तो अगदींच आवडत नाहीं ! तुम्हांला त्या व्याख्यानाच्या वेळीं चहा–निषेधपर झालेलं बंडूचं काव्य-गायन आठवत नाहीं वाटतं ?

**श्यामला :** कमलाबाई, त्याचं कशाला हवं ? आपलं काव्य-गायन झालं, तरी आम्ही खुशाल ऐकूं व आपल्या गाण्याची चहा करूं !

**कमला :** अरेरे ! पवित्र गाण्याला सुद्धा तो चहा चिकटला ना ?

( जाति –‘ अक्रूर ’ )

**किती बाई तरि जगीं चहाची महती**
**त्रिभुवनीं जाहली ख्याती ॥ ध्रु० ॥**
**तो अंगानें श्यामल श्यामल दिसतो**
**नच मजला तो आवडतो**
**गुण त्याचे हे मजला सगळे ठावे**
**लोकांत कशाला गावे ?**

**कशि बाई साखर भुलली**
**जन्माची त्याच्या झाली**
**म्हणुनी ही गोडी आली**
**हं ! पुरे आतां संगत त्याची जगतीं**
**पोटांत मी न ह्या ओतीं ॥ १ ॥**

**श्यामला :** अग कमले, पोटांत ओतूं नकोस ! तोंडांत ओत आणि पोटांत ठेव, समजलीस ?

**कमला :** मी अगदीं ऐकणार नाहीं तुझं, श्यामले. ह्या चहाचं गुणदोषविवेचन शास्त्रकारांनीं कसं केलं आहे, तें तुला काय ठाऊक ! कुंदकळ्यांसारखे आपले मोहक व निर्मल दांत ह्या कडक व कढत चहानें श्यामल नि शिथिल व्हायचे आणि लवकरच पडायचे !

**श्यामला :** म्हणजे ह्याच्या संगतीनें तुझे दांत पडतील म्हणतेस तर ! मला हें तुझं म्हणणं थोडंसं पटतं म्हणा !

**विमला :** पण लागलेच दांत धुऊन स्वच्छ करावे ! उपायाला अपाय आणि अपायाला उपाय हा सगळीकडे आहेच !

**कमला :** हं ! हं ! समजला, समजला शास्त्रार्थ तुमचा ! मी कांहीं सरलेएवढी सरळ नाहीं ! इतकं कशाला ? तो मेला चहा एकदा का हृदयांत जाऊन बसला, म्हणजे तो आंतडीं न् आंतडीं अशीं कुमकुवत करून टाकतो, कीं ज्याचं नांव तें ! मग अगदीं विमल दूध जरी आणलं, आणि तें सरळ जरी तोंडांत ओतलं तरी तोंड जरा आंबट व्हायचंच !

**श्यामला :** अगबाई, तूं अगदीं कवयित्रीच दिसतेस ! आमची विमल आणि सरल ह्या तर तोंडांत आल्याच, आतां ही श्यामल वांचत्ये कीं नाहीं पाहावं !

**कमला :** चहांत टॅनिन नांवाचं द्रव्य असतं. तें पोटांत गेलं म्हणजे आपल्या आंतड्यावर त्याचे परिणाम होतात व तीं श्यामल – काळसर होऊन कार्यक्षम राहात नाहींत !

**श्यामला :** आतां मात्र कवयित्री, तुला नमस्कार असो ! होय, चहा तर निवत चालला ! चला, आपण हा स्वदेशी चहा थोडथोडा घेऊं ! आपणांस ठाऊक नाहीं का कमल किती हट्टी पोर आहे ती ! जाऊं द्या. ती थोडंसं दूध घेईल.

( सर्व थोडथोडा चहा घेतात, कमला दूध घेते. )

**कमला :** कांहींही असो, माझ्या बोलण्याचा तुमच्या मनावर परिणाम होवो ,अगर न होवो, परंतु मी पुन्हा निक्षून सांगतें, कीं चहा घेणं बरं नव्हे ; त्याचा सहवास फार नसावा.

**श्यामला :** बरं तर, विमल, ह्या कमलेच्या सांगण्याचा आपण थोडा मान ठेवूं ; कारण चहाचा फार सहवास नको हें मलाही पटत आहे. आरोग्यशास्त्रदृष्ट्या ह्याच्यापासून फायद्यापेक्षां तोटेच जास्त आहेत ; म्हणून त्याचा सहवास फार नसावा हें कमलेचं म्हणणं आपणांलाही पटेलच. तेव्हां आपणांला चहा-सेवन अगदीं सोडतां आलं तर उत्तम ; नाहीं तर निदान देशी, उत्तम, शास्त्रोक्त रीतीनें तयार केलेला व प्रकृतीला अपायकारक न होईल इतकाच चहा आपण घ्यायचा असं आतां ठरवूं या.

**विमला :** आपणाला ही गोष्ट अगदीं मान्य आहे.

**सरला :** मी तर काय, विमला वागेल तशीच वागणार.

**लीला :** मी कमलेच्या बाहेर कशी जाईन ? पण चहावर कडकडीत बहिष्कार तर नाहीं ना ?

**सुशीला :** मी बोलून चालून सुशीला ! मला विचारपूर्वक वागून आपलं शील राखलं पाहिजे !

**कमला :** नाहीं तरी तुम्ही मला कवयित्री म्हणतच आहां ना ! मग मीं केलेलं हें गोड गाणं अशा विजयाच्या वेळीं म्हणूं या.

## चहाचें स्तोम

[ चाल – हे प्रभो विभो — ]

हं नको, नको, नको चहा हा असला ॥
जरि गोड गोड हा गमला ॥ ध्रु० ॥
परकीय मूळ हा असुनी
धन दौलत नेई हिरुनी
सामर्थ्य जातसे खचुनी
हा बरा न सहवासाला ॥ १ ॥
जरि कितीहि याचें स्तोम
क्षणभर दे जरि आराम
पुरवि हा मनाचे काम
तरि अंतीं दुःखद सकलां ॥ २ ॥

---

## पतंग

[ चल : तूं टाक चिरून ही मान ]

हा पतंग किततरि छान
नुरवि हा भान
किति उंच उंच हा जाई उडुनी
तळपे काय विमान ॥ ध्रु० ॥
हा तंग कितीतरि दोर
जणुं मानस हृ खंबीर
जरि वारा डुलवि फार
परि सूत्र हातिंचें
खेंचुनि धरितें
त्याची सान कमान ॥ १ ॥

# अभ्यास

**बंडू :** मधू, किती वेळ तुझी वाट पाहात आहें ! मला तर अगदीं कंटाळा आला आहे आज ! अरे, काय हा अभ्यास ! गणित, शुद्धलेखन, इतिहास, शब्दार्थ, वाचन, इंग्रजी, अबब ! ! ! तुला जर यादी सांगितली तर छाती दडपूनच जाईल ! तुम्ही आपले वरच्या वर्गांतले; तुमचे मास्तर तुम्हांला काय इतका अभ्यास देणार आहेत ! खालचेच वर्ग कठीण असं म्हणतात तें मला अगदीं पटलं !

**मधू :** बंडू, ही काय तुझी आजचीच रड आहे ? रोजच तुझी ही रड ! बरं, रात्रीचा दिवस करून तूं अभ्यास करतोस, तरी वर्गांत तुझा नंबर खालीं तो खालींच !

**बंडू :** मधू, अगदीं खरं ! मी इंग्रजी दुसरींत आल्यापासून रात्रीं ११ वाजल्याशिवाय निजलों नाहीं; संध्याकाळीं खेळायला गेलों नाहीं; अगदीं रात्रंदिवस अभ्यास करतों; तरी माझा आपला नंबर खालीं ! काय तरी जुलूम हा ! आणि तो वकिलांचा बापू आहे ना ? तो संध्याकाळीं खेळतो, रात्रीं निजतो, तरी आपला वर्गांत पहिला ! ह्याला काय म्हणावं !

**मधू :** बंडू, ह्याला म्हणावं तुझा घमळूपणा ! पाहा, हीं तुझीं पुस्तकं किती अव्यवस्थित दिसत आहेत. ही तुझ्या इंग्रजी शब्दार्थांची वही; ह्यामध्यें स्पेलिंग किती अशुद्ध आहे ! हें तुझं रफ् नोटबुक; ह्याच्यावर मधून मधून हीं घोड्याकुत्र्यांचीं चित्रं व रेघोट्या कशाला ओढल्या आहेस ? बरं, हीं दुसऱ्याच्या वहीवरून उदाहरणं काय उतरीत आहेस ? ही का कुठं अभ्यास करायची पद्धत ?

**बंडू :** तर मग तूं नाहीं का अशा रीतीनें अभ्यास करीत ?

**मधू :** नाहीं. माझी पद्धति अगदीं भिन्न आहे. ती लहानपणापासून माझ्या बाबांनीं मला लावून दिली आहे. आतां ती माझ्या अगदीं आंगवळणीं पडली आहे. त्या पद्धतीनेंच मी अभ्यास करीत असल्यामुळें माझ्या हातून थोड्या वेळांत पुष्कळ अभ्यास होतो.

**बंडू :** ओहोहो ! तूं जर का ती पद्धति मला सांगितलीस, तर मग तूं मला एक जादूच शिकविल्यासारखं होईल. जसा गारुडी हँ हँ म्हणतां रुपयांची रास पाडतो, त्याप्रमाणें मी हँ हँ म्हणतां अभ्यासाची रासच रास पाडीन !

**मधू :** तुला आपली प्रत्येक गोष्टीची थट्टाच वाटते ! मनुष्याच्या ठिकाणीं कांहीं तरी गांभीर्य असावं लागतं. शांतपणानें, ऐकणार असलास तरच मी तुला सांगेन, नाहीं तर माझं बोलणं माझ्याच जवळ राहील !

**बंडू :** असा रागावूं नकोस; खरंच सांग. अरे, मी तर अगदीं अभ्यास करतांना टेकीस येतों ! जर तूं कांहीं उपाय सांगितलास तर फारच चांगलं होईल ह्यांत शंका नाहीं.

**मधू :** पहिली गोष्ट मी लक्षांत ठेवीत असेन, तर ती नियमितपणा. शाळेंत जाण्यांत, अभ्यासांत, खेळांत, झोपेंत, प्रत्येक व्यवहारांतच म्हणस ना, मी अगदीं नियमितपणा ठेवतों. त्यामुळें माझीं कामं वेळच्या वेळीं होऊन व्यवस्थित होतात. दुसरी गोष्ट म्हणजे पूर्वावलोकन. शाळेंत जे अभ्यास नवीन शिकायचे असतात ते मी अगोदर पाहून ठेवतों. त्यामुळें शाळेंत सांगितले जाणारे विषय मला चांगले समजतात व त्यांच्या संबंधानें मला माझ्या शंकाही विचारतां येतात. वर्गांत विषय समजत असल्यामुळें मला त्यांत स्वाभाविक गोडी वाटून माझं चित्त रमतं. सावधानता ही तिसरी महत्त्वाची गोष्ट असते. वर्गांत लक्ष असलं म्हणजे आपलं अभ्यासाचं अर्धं काम होतं. शाळेंत झालेले अभ्यास मी पुन्हा घरीं एकदा पाहातों व काय सांगितलं त्याचं मनन करतों. ह्याला नांव द्यावयाचंच तर ‘ पुनरावलोकन ’ असं देतां येईल. तेव्हां ‘ पुनरावलोकन ’ ही चौथी महत्त्वाची गोष्ट होय.

**बंडू :** अरे मधू, असे मोठमोठे शब्द घालून माझी परीक्षा घेतोस होय! पण मला मराठी येतं समजलास! ' पुनरवलोकन ' म्हणजे पुनर् + अवलोकन, असंच कीं नाहीं?

**मधू :** होय; ' पुनरवलोकन ' म्हणजे ' उजळणी 'च कां म्हणेनास? ' उजळणी ' म्हटलं तरी चालेल. अभ्यासाच्या संबंधानें आणखी एक दोन महत्त्वाच्या गोष्टी तुला सांगतों; तूं आपला प्रत्येक गोष्ट पाठ करीत सुटतोस; तर असं पाठ कधींही करूं नये. कोणतंही पुस्तक लक्षपूर्वक वाचावं; वाचतांना त्यांतील महत्त्वाच्या संस्मरणीय गोष्टींवर खुणा कराव्या नि त्याच गोष्टी पाठ कराव्या. इतिहास हाच विषय घेईनास; मी तुला जेव्हां जेव्हां पाहातों, तेव्हां तेव्हां तूं शब्दशः पाठ करण्याचा प्रयत्न करीत असतोस. ह्यामुळें वेळ पुष्कळ जाऊन सगळं पाठ न झाल्यामुळं महत्त्वाच्या गोष्टी तशाच राहून जातात. तेव्हां सगळं पाठ करीत न सुटतां गोष्टीसारखी हकीकत लक्षांत ठेवावी व अगदीं महत्त्वाचं म्हणून जें आपले गुरुजी सांगतात तेवढंच पाठ करावं.

**बंडू :** अरे, तूं तर माझ्या मुळावरच घाव घातलास! मी तर म्हणतों पाठ करून टाकलं म्हणजे भीति नाहीं.

**मधू :** माझ्या म्हणण्याचा अनुभव पाहा म्हणजे तुला कळेल. आमचे संस्कृतचे गुरुजी नेहमीं म्हणतात, " **यथा मधुलिट् पुष्पं योजयेत् पुस्तकं तथा** " तें कांहीं खोटं नाहीं.

**बंडू :** अरे, पण मला कुठें संस्कृत येतं आहे? काय? काय ते म्हणतात?

**मधू :** ते म्हणतात,

**जसा मधुप सेवितो मधु मरंद पुष्पांतला।**
**तसा चतुर छात्र घे सुरस अंश ग्रंथांतला॥**

**बंडू :** शाबास! एवढ्यांत काव्य रचलेंस वाटतं? शीघ्र कवीच दिसतोस!

**मधू :** अरे, ही आमच्या गुरुजींचीच कविता आहे. अरे ! पण हें काय ? पांचाचे टोले पडले कीं ! मला आतां क्रिकेट खेळायला गेलं पाहिजे. तूं येत असलास तर चल माझ्याबरोबर. खेळानं अभ्यासाचा शीण नाहींसा होऊन तरतरी येते.

**बंडू :** चल तर. मीही आतां तुझ्याप्रमाणेंच अभ्यास करतों आणि तुझ्याप्रमाणें दररोज संध्याकाळीं खेळही खेळतों. चल, आजच प्रारंभ करूं या.

**मधू :** माझं आवडतं गाणं तूं ऐकलंस नाहीं का ? त्यांत अभ्यास-योगाचं रहस्य किती मार्मिकपणें सांगितलं आहे !

**बंडू :** चल, जातां जातांच म्हणूं या !

**मधू :** [गाणं म्हणतो व म्हणत म्हणत दोघे चालूं लागतात.]

## खरा अभ्यास

[चाल : तूं टाक चिरुनि ही मान]

**हा नसे मनातें त्रास । खरा अभ्यास**
**जरि शांतपणानें विचार ठेवुनि**
**धरिशी याचा ध्यास ॥ ध्रु० ॥**
**नियमित निरंतर रहावें**
**अवलोकन पूर्वी करावें**
**अवधान सदा ठेवावें**
**तरि पुन्हा पुन्हा तें अवलोकुनियां**
**धरीं सदा ह्व्यास ॥ १ ॥**
**खेळावें सायंकाळीं**
**अभ्यास खेळ ही जोडी**
**नियमितपणा नच सोडीं**
**शरीर सुंदर, मानस सुंदर**
**करील मग हें खास ॥ २ ॥**

# वीरांगना

[ जिजाऊचा महाल : जिजाऊ देवीचें स्तवन करीत आहे ;
जवळच सख्या हात जोडून बसल्या आहेत. ]

**जिजाऊ :**

**पद**

[ चाल : सखे मी मुरारि ]

**किती वंदु हे अंबिके अंबिके ।**
**कुठें सांग गे ! देश माझा चुके ॥ ध्रु० ॥**
**रुते पारतंत्र्यीं किती हा तरी ।**
**कसा उद्धरावा कथीं सत्वरी ॥**
**तुझ्या स्फूर्तिसाठीं सदा मी सुकें ॥ २ ॥**

[ गाणें म्हणत म्हणत देवीच्या चरणांवर डोकें ठेवते व कांहीं वेळ जातो.

**मालती :** काय माईसाहेब !

**वीरवती :** हं ! त्यांना हाक मारूं नको. स्वराज्य-संस्थापक श्रीशिवाजीमहाराजांवर सतत कृपा-दृष्टि असावी व मातृभूमीचा उद्धार व्हावा, म्हणून त्या अंबाभवानीचं ध्यान करीत आहेत.

**जिजाऊ :** (सावध होऊन) हं ! आतां समजलं ! ह्या माझ्या सख्यांना आपल्या मुलांना देशभक्तीचं बाळकडू घालायला मीं शिकवावं असंच ना ? ह्यांतच देशाचा उद्धार ! अहाहा ! काय दिव्य संदेश !

**रत्नवती :** हं ! हं ! माईसाहेब, काय म्हणतां ? आम्हीं आमच्या मुलांना देशभक्तीचं बाळकडू पाजावं ?

**जिजाऊ :** होय ; त्यानेंच आपल्या देशाचा उद्धार होईल ! आपल्या मातृभूमीची सेवा करण्याचं खरं शिक्षण मातांनींच दिलं पाहिजे. 'जिच्या हातीं पाळण्याची दोरी । तीच देशातें उद्धारी' हें कांहीं खोटं नाहीं !

**वीरवती :** पण आम्ही काय करणार? आमचीं पोरं तीं केवढीं आणि त्यांना देश तो काय समजणार?

**जिजाऊ :** हं! असं म्हणूं नका! माझा बाल—शिवाजी लहानच आहे ना? त्याच्याच पावलावर पाऊल ठेवायला तुम्हीं आपल्या मुलांना शिकवलं, तरी पुष्कळ कार्य होईल! हे अंबिके, माझ्या शिवबाळावर तुझी कृपा मात्र सदा असूं दे वरं का!

पद

[ चाल : रुसलासी हरी कां बरें ]

**तव असो प्रेम अंबिके ॥**
**मम सुतावरहि सारखें ॥ ध्रु० ॥**
**किती शूर बाळ हा असे ॥**
**श्री शिवाजी तुज हें दिसे ॥**
**करिं कृपा तयावर सखे ॥ १ ॥**

**वीरवती :** माईसाहेब, आपण एकसारखी देवीची उपासना चालविली आहे; मग आम्हींही अशी उपासना करावी म्हणतां?

**जिजाऊ :** होय, आपल्या देवतांची उपासना व धर्मश्रद्धा ह्या गोष्टी तुमच्या ठिकाणीं पाहिजेत व त्या तुम्हीं आपल्या मुलांमध्येंही आणल्या पाहिजेत.

**वीरवती :** होय, खरं आहे. आपल्या धर्माची अशी स्थिति झालेली पाहून श्रीशिवाजीमहाराजांना सुद्धा अगदीं भरून येतं, असं आमचीं मुलंही आम्हांला सांगतात.

**जिजाऊ :** होय, माझ्या शिवबाप्रमाणें जाज्वल्य धर्मभावना जर तुम्ही आपल्याही मुलांच्या ठिकाणीं निर्माण कराल, तर स्वधर्मावर परकीयांचे होणारे हल्ले तेच शूर बच्चे परतवतील!

**रत्नावती :** होय माईसाहेब!

**वीरवती :** मी काय, रत्नावती काय आणि मालती काय, कशा झालों तरी जातिवंत आर्य स्त्रिया आहोंत! हें मराठ्यांचं पाणी, ह्या धर्मावर हल्ला करणारांना पाणी पाजील ह्यांत काय संशय?

**जिजाऊ :** तुमचा हा उत्साह पाहून मला आनंद होत आहे. पण आणखी कांहीं गोष्टीही लक्षांत ठेविल्या पाहिजेत. आपल्या धर्माप्रमाणें आपला देशही आपणांस प्रिय आहे. माझ्या शिवबानें चालविलेल्या स्वराज्यस्थापनेच्या कार्याला सर्वांनीं अंतःकरणपूर्वक मदत करावी, म्हणून तुम्ही स्त्रियांमध्यें प्रचारकार्य करून आपल्या मुलांनाच नव्हे, तर भाऊ व पति ह्यांनाही देशकार्याकडे वळवलं पाहिजे.

**वीरवती :** होय! आम्ही असंच म्हणतों कीं, आम्ही वीर–माता, वीर–भगिनी व वीर–रमणी होणार! आमचं राष्ट्र वीर्यवान् झालं पाहिजे. माईसाहेब! आपल्या आशीर्वादानें व देवी अंबिकेच्या कृपेनें ही गोष्ट सहज साध्य होईल!

**जिजाऊ :** पण लक्षांत ठेवा, त्याला तपश्चर्या पाहिजे. आपलं शील व पावित्र्य अभंग ठेवलं पाहिजे. माझी आवड कशी आहे तें सांगूं का तुम्हांला?

## पद

[ चाल : सेविन देश–बंधुंना ]

**निर्मल आवडे मना**
**उच्च उच्च येती या**
**हृदयीं भावना नाना ॥ ध्रु० ॥**
**ईश–पदीं प्रेम जडे**
**धावत हें मत तिकडे**
**देश–देव–सेवा ही**
**दे स्वराज्य–नव–घटना ॥ १ ॥**

**वीरवती :** माईसाहेब, बराच वेळ झाला; आतां निरोप घेतों. ( तिघीही नमस्कार करतात ) आपल्या आशीर्वादानें आमचीं अंत:करणं जागृत झालीं आहेत.

**रत्नवती :** माईसाहेब, माझं नांव रत्नवती आहे, तेव्हां रत्नांप्रमाणें आमच्या पुत्रांचं व कन्यकांचं तेज फाकण्याकरतां तीं धर्म नि देश ह्यांनाच वाहिलीं पाहिजेत असं मी म्हणतें !

**मालती :** माईसाहेब, आपल्या चरणांची अखंड सेवा आमच्या हातून घडो, हीच आतां आमची इच्छा आहे.

**वीरवती :** माईसाहेब, आतां मी माझं आवडतं 'महाराष्ट्र–गीत' म्हणतें.

**जिजाऊ :** महाराष्ट्र हा सर्वांचाच नाहीं का? मग सर्वांनींच तें एकत्र म्हणूं या.

## पद

[ त्रिताल, भैरवी ]

वंदन मंगल मातृ–भूमित ।
सकल जनातें सुख जी देते ॥ ध्रु० ॥
महाराष्ट्र ही महा देवता
प्राणहि अर्पूं तच्चरणातें ॥ १ ॥

---

## भाव–मीलन

जगतीं फुलती फुलें मुलें । म्हणुनि जगदुद्यान खुले ॥
भाव मनोहर हृदयाचे । रंग खुलती त्या पुष्पांचे ॥
हृदया हृदया एक करूं । प्रेमभरें या ऐक्य करूं ॥
गाऊं नाचूं आनदें । विश्वचालका तव छंदें ॥ १ ॥

---

# स्त्री शिक्षणाची आवश्यकता

[ मालिनी व शालिनी बोलत बसल्या आहेत. ]

**मालिनी :** ( शालिनीची मोठी बहीण ) आपल्या ह्या शहरांत अलीकडे स्त्रीशिक्षणाची अभिरुचि वाढत आहे, त्याचं बरंचसं श्रेय आपल्या बाबांनाच दिलं पाहिजे. आपले बाबा चांगले नांवाजलेले पुढारी असून त्यांनीं स्त्रीशिक्षणाची खटपट केली म्हणूनच ही स्थिति प्राप्त झाली आहे.

**शालिनी :** तूं आपली प्रत्येक गोष्टीचं यश बाबांनाच देत असतेस ! पण खरं पाह्यलं तर आपली आईच मुली शिकाव्या म्हणून सारखी खटपट करीत असते. परवां स्त्रीशिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून स्त्रीवर्गांत जागृति करण्यासाठीं स्त्रियांची जी प्रचंड सभा झाली, त्यांत आपल्या आईनेंच प्रमुख भाग घेतला होता. आपल्या आईनें त्या दिवशीं केवढं दणदणीत भाषण केलं ! मला तर वाटतं हा सगळा आपल्या आईच्याच खटपटीचा परिणाम !

**मालिनी :** तूं म्हणतेस तेंही खरं, नि मी म्हणतें तेंही खरं. आईनं जशी स्त्रीसमाजांत जागृति चालवली आहे, तशीच पुरुषवर्गाची सहानुभूति संपादन करून त्यांना कामाला लावण्याचं कार्य बाबा करीत आहेत. पुरुष नि स्त्री हीं दोन्हीही सुशिक्षित असलीं तरच समाजसेवेचं कार्य होतं; एरव्हीं एका चाकाचं गाडं कसंतरी आपलं चालत राह्यचं दुसरं काय ?

[ इतक्यांत ताई — शास्त्रीबुवांची वडील बहीण — आपल्या मुलीसह प्रवेश करिते. ]

**ताई :** काय ग, एका चाकाचं गाडं काय म्हणत होतां ? सायकलला सुद्धा दोन चाकं असतात, मग हल्लीं कांहीं नवीन प्रकारची गाडी निघाली आहे वाटतं ?

**मालिनी :** होय, तुम्हांला नाहीं का ठाऊक ? तुमच्यासारखी अशिक्षित बायको असली म्हणजे संसाराची रें रें करीत चालणारी एकचाकी गाडीच म्हणायची ती !

**ताई :** तुम्हांला आपलं तसं वाटतं ! पण आमचं कुठं अडतं आहे का सांगा पाहूं ? आमचं माहेर म्हणजे मूळचं शास्त्री घराणं. आम्हांला आमचे जुने आचार-विचार पाळले पाह्यजेत. वाटलं तर थोडं फार शिकावं. पण अलीकडे शिक्षणानं जे चोचले वाढतात ते मात्र मला मुळींच आवडत नाहींत !

**यमू :** आई, मी आतां ह्या शालिनी-मालिनीप्रमाणेंच इंग्रजी शाळेंत जाणार. तूं एक आपली शिकली नाहींस म्हणून मलाही शिकवूं नये, असं का आहे ?

**ताई :** मालिनी, आज ह्या आमच्या यमूनें माझी सारखी पाठ घेतली आहे. तिला आपलं इंग्रजी शिक्षणाचं वेड लागलं आहे. पण...

**मालिनी :** पण काय ? विचार कसला करतां ? मागें तिला मराठी शिकवायला आपण तयार नव्हतां नि आतां इंग्रजींत घालायला तयार नाहीं, म्हणजे आपणाला शिक्षणाची एवढी भीति तरी कसली वाटते ?

**ताई :** मालिनी, खरंच सांगूं का तुला ? अग ह्या शिक्षणानेंच तर सगळं बुडवलं ! ह्या पोरी शाळेंत जाऊं लागल्या म्हणजे कशा नटतात तें बघावं ! पाठीवर वेण्यांचे शेपटे काय सोडतात, आंगांत फ्रॉक काय घालतात, तोंडाला ती माकडासारखी पावडर काय लावतात, दिसते न दिसते अशी कुंकवाची टिकली काय लावतात—उगाच आणखी कशाला बोलूं ? तुम्हांला सुद्धा तें वाईट लागायचं ! मी म्हणतें, ह्या शिक्षणानं आपलं जुनं अगदींच बुडालं !

**शालिनी :** काय हो ताईबाई, तुम्हांला तें जुनं वेणीचं चाक जर आवडतं तर तुम्हीं हा नवीन चालीचा असा अंबाडासा बांधला

आहे ? नि आंगांत जुन्या गांठीची चोळी न घालतां हें भलं खासं पोलकं कां हो घातलंत ? शिकलेल्या मुलींनीं उचललेल्या चालीरीति चांगल्या म्हणूनच ना तुम्ही त्या हळूहळू उचलल्यात ?

**मालिनी :** शाळू, लहान तोंडीं मोठा घास घेण्याची तुला फार संवय बाई ! ताई केवढ्या नि तूं केवढी ! मोठ्या माणसाचं मन युक्तीनेंच वळवलं पाह्यजे. [ ताईकडे वळून ] अहो ताईबाई, नवीन तेवढं टाकाऊ अशा प्रकारचा गैरसमज होऊं देऊं नका. सौंदर्याची अभिरुचि ही स्त्रियांमध्यें स्वाभाविक असते. सौंदर्याच्या प्रकारांत कालमानानुसार थोडा फार फरक होतो एवढंच. आपण मुलीला शिकवलं नाहीं तर तिला सध्याच्या जगाचं ज्ञान तरी कसं होणार ? शिक्षणाचं महत्त्व माझ्यासारखी शिकाऊ मुलगी तुम्हांला काय सांगणार म्हणा ; पण आमच्या आईनं जर तुमचे हे विचार ऐकले तर ती तुमची खात्री करून देईल. आज स्वयंसेविका म्हणून ती इथं इतक्यांत यायची; अजून कां बरं आली नाहीं ?

[ इतक्यांत बाईसाहेब येतात. ]

**बाईसाहेब :** शाळू, मालिनी, मी इथं पलीकडे सभेची व्यवस्था करीत नव्हतें का ? पण तुम्हीं आज ह्या ताईंना इकडे कसं काय आणलं ? ताई म्हणजे उंबराचं फूल ! कोणतीही स्त्रियांची सभा असो, ह्या यायच्या म्हणजे मोठ्या कष्टानेंच !

**ताई :** आमच्या यमीनं पाठ पुरवली म्हणून आल्यें बाई ! तिला इंग्रजी शिकायचं आहे; तुमच्या शाळूसारखा पोषाख करायचा आहे; तुमच्या स्वयंसेविका-दलांत यायचं आहे; नि काय काय करायचं आहे ! म्हणून म्हटलं एकदा सभेला जाऊन आपले विचार तरी ऐकावे नि आपली भेट घ्यावी. पण काय हो बाईसाहेब, मुलींना इतकं शिकून करायचंय् काय ?

**बाईसाहेब :** ताईबाई, आपण श्रीमंत आहां, मोठ्या घराण्यांतील आहां. आपण जर शिक्षणाला पाठिंबा देणार नाहीं तर आपला

स्त्रीसमाज पुढें तरी कसा येणार ? अहो, सगळं जग किती पुढें गेलं आहे पाहा. आम्हीं मात्र मुलींना शिकवावं कीं नाहीं हाच विचार अजून करीत आहों ! स्त्री असो वा पुरुष असो, शिक्षणाशिवाय त्याची उन्नति होणंच शक्य नाहीं. स्त्री झाली तरी समाज-घटकच आहे; ती जर सुशिक्षित झाली नाहीं, तर समाज कसा सुधारेल ?

**ताई :** तें खरं, पण म्हटलं फार शिकून काय करायचं आहे ?

**बाईसाहेब :** अहो, स्त्रियांनीं करण्यासारखीं समाजकार्यं काय थोडीं पडलीं आहेत ? पुणें येथील 'सेवासदन' सारख्या संस्था स्त्रियांना सुशिक्षित नि स्वावलंबी करीत आहेत, तें काय उगाच ? शिक्षणप्रसारा-शिवाय आपल्या समाजाचं पाऊल पुढें कसं पडेल ?

**ताई :** होय, पण प्रत्यक्ष व्यवहारांत आज त्याचा उपयोग काय ?

**बाईसाहेब :** निरनिराळीं कलाकुसरीचीं कामं, ललितकलांचा विकास, रुग्णपरिचर्या, अनिष्ट रूढींचं नि व्यसनांचं निर्दालन हें काय लहान कार्य आज सुशिक्षित स्त्रियांनीं आपल्या अंगावर घेतलं आहे ? इतकं कशाला ? राज्यकारभारांतही स्त्रियांना आतां अधिकार मिळत आहेत !

**ताई :** खरं बाई, शिक्षण पाहिजे हें मला पटलं आतां. मी माझ्या यमूलाही इंग्रजी शिकायला पाठवतें नि मीही पण तुम्ही सांगाल तें स्त्री-समाजाचं कार्य करायला येतें !

**शालिनी :** काय, म्हणतां काय ताईबाई ? तुमची यमू आमच्याबरोबर इंग्रजी शिकायला येणार ?

**मालिनी :** हं, शालू, काय हा उतावळेपणा ! उगाच मोठ्या माणसाला असं बजावूं नये लहानानें.

**ताई :** त्यांत काय झालं ? मोठेपण कांहीं वयावर नसतं ! मनानें मोठं तेंच मोठं. तुम्ही जरी मुली असल्यात तरी तुमचे विचार थोरांचेच

आहेत. कवि जगन्नाथसुत ह्यांचं तें आवडतं पद तुमच्या तोंडून पुन्हा एकदा ऐकावं असं मला आतां वाटतं आहे.

**मालिनी :** नि यमीलाही पण तें आवडतं; मग सगळ्यांनींच म्हटलं तर नाहीं का चालणार ? त्यांत भगिनीवर्गाला शिक्षण देण्यासंबंधानें केवढी कळकळीची विनंती केली आहे ! चाल पण किती गोड नि साधी आहे !

**शालिनी :** आईनें म्हटलं तरच मी म्हणेन !

**बाईसाहेब :** काय बाई हट्टी पोर ही ! बरं, चला तर म्हणा पाहूं सगळ्याजणी माझ्याबरोबर —

## पद

[ जाति–अक्रूर ]

**या देऊं या शिक्षण निजभगिनींना ।**
**हा मार्गचि राष्ट्रोद्धरणा ॥ ध्रु० ॥**

**किती भिन्न मतें, भिन्न पंथ वा असती ।**
**ह्या ठायीं कांहीं नुरती ॥**
**मनिं हेतु वसे ज्ञान विमल मिळवावें ।**
**आत्मोन्नतिकारक व्हावें ॥**
**ह्या जगताच्या अफाट जीवन–कलहीं ।**
**निज–जीवन हो सुखदायी ॥**
**म्हणुनियां आर्यभगिनींनीं**
**विद्येनें युत होवोनी**
**चमकावें निजसुगुणांनीं**
**ही आकांक्षा असे आज सकलांना ।**
**विद्येला तुकवा माना ॥ १ ॥**

# बालदिन — संवाद

[ **पात्रें** : मधुकर, बंडू, माधव व शरद् ]

**मधुकर :** अहाहा ! किती आनंदाचा दिवस आजचा हा ! आज बालदिन नव्हे का ? बालदिन म्हणजे बालांचा दिवस— ' Children's day ' ! आज सगळ्या जनतेचं लक्ष ह्या बालकांकडेच लागलं आहे.

**बंडू :** काय हें थोतांड ! अरे, एऱ्हीं काय आमच्या पालकांचं लक्ष आमच्याकडे नसतं ? बालदिन म्हणून तुझ्या शाळेच्या चालकांनीं असं काय करायचं ठरवलं आहे, कीं त्यामुळें तुला इतका आनंद व्हावा नि तूं इतका आनंदानें उड्या मारूं लागावास ?

**मधुकर :** अरे, तशीच मौज आहे, नि तितकंच ह्या दिवसाचं महत्त्वही आहे.

## पद

[ चाल—भारतीं सृष्टीचें वैभव खेळे ]

**बालदिन आज मजेचा आला ।**
**आनंदीआनंद मुलांना झाला ॥ ध्रु० ॥**
**बालक चालक भावि कालाचे**
**आधार जणों हे निजराष्ट्राचे**
**त्यांना जागृत करण्या आला**
**आनंदीआनंद मुलांना झाला ॥ १ ॥**
**मैदानी मर्दानी खेळ खेळाया**
**आनंदें मजेनें नाचाया गाया**
**उत्साह नवीन देत हा आला**
**आनंदीआनंद मुलांना झाला ॥ २ ॥**

कर्तव्य-जागृती आणाया जनां
वाढाया बालांची प्रेम-भावना
मिरवणूक काढूं थोर आजला
आनंदीआनंद मुलांना झाला ॥ ३ ॥

**बंडू :** ओहो ! हो, हो ! असा कार्यक्रम आहे तर ! अस्सं अस्सं ! मग सारीच मौज आहे म्हणायची !

[ इतक्यांत माधव व शरद् प्रवेश करितात. ]

**माधव :** काय रे, बोलत काय बसलां ! आपल्याला आजच्या बालदिनोत्सवांत भाग घ्यायचा आहे ना ?

**मधुकर :** होय, पण हा बंडू अगदींच नाराज दिसला, म्हणून त्याला थोडक्यांत बालदिनाची मौज सांगितली.

**शरद् :** केवळ मौजेकरितांच बालदिन आहे असं का तुला वाटतं ?

**मधुकर :** तसं नव्हे रे, पण ह्या बंडूसारख्या उनाड नि बंडखोर मुलाला पहिल्यानें त्यांतली मौज तेवढीच सांगितली पाहिजे !

**बंडू :** मग ह्याहून कांहीं उदात्त हेतु ह्या बालदिनाचा आहे वाटतं ?

**मधुकर :** बंडू, हे बालदिनोत्सव अत्यंत उदात्त हेतूनेंच सुरू केलेले आहेत. पुणें येथील 'ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन' ह्या संस्थेचे प्रिन्सिपॉल सन्माननीय तावडेसाहेब ह्यांनीं प्रथमतः ह्या बालदिनाची प्रथा आपल्या इकडे सुरू केली.

**बंडू :** मग इतक्या थोर पुरुषाचा असे उत्सव मुद्दाम सुरू करण्यांत कांहींतरी हेतु असेलच.

**मधुकर :** होय. पाश्चात्य देशांत असे उत्सव सुरू झालेलेच आहेत; तेव्हां आपल्या देशांतही त्याचा मूळ हेतु "मुलाचं शिक्षण, आरोग्य नि शील ह्यासंबंधानें पालकांवर असलेल्या जबाबदारीची जाणीव त्यांस करून द्यावी नि आपण राष्ट्राचे घटक असून आपणांविषयीं आपले पालक नि

समाज किती कळकळ बाळगतो ह्याची जाणीव मुलांमध्येंही उत्पन्न करावी " म्हणून हा बालदिन सुरू करण्यांत आला.

**बंडू :** अस्सं, अस्सं! आतां मला कल्पना आली. मग मीही आज बालदिनाच्या सर्व कार्यक्रमांत भाग घेणार.

**मधुकर :** कवि कामत ह्यांचं बालांचं महत्त्व दर्शविणारं गाणं ऐकलं आहेस का तूं? खरंच किती गोड आहे तें!

**शरद् :** हो, हो, तें तर छानच गाणं आहे! पोरं म्हणजे काय पोरंच, असं जें कित्येकांना वाटतं तो भ्रम त्यानं अगदीं दूर केला आहे.

**मधुकर :** ऐका हं!

[ चाल : आकळे न अघटित घटना ]

**बाल हेच पुढती होती थोर थोर ना!**
**काय येत नाहीं अजुनी हीच कल्पना?**
**कचरतांच शिक्षण द्याया**
**शील शिस्त त्यां लावाया**
**नव–युगांत पद अर्पाया**
**भीति कां मना?**

**माधव :** हं मधुकर, गाणं गोड खरं, पण आपणच आपल्या पालकांवर टीका केल्यासारखं नाहीं का होत ह्यानं? आपले पालक आज आपल्याला शिक्षण देत नाहींत, कीं शील कसं वाढेल हें पाहातच नाहींत?

**बंडू :** अरे, हें कवीचं गाणं सर्वसामान्य आहे. सगळेच पालक आपल्या मुलांविषयीं काळजी घेत असतात असं का तूं समजतोस? जे काळजी घेत नाहींत, त्यांनाच उद्देशून हें आहे.

**माधव :** अस्सं, अस्सं! पण काय रे, आपले पालक आपणांला शाळेंत पाठवून आपल्या शिक्षणाची काळजी घेत आहेतच; मग आतां शील नि शिस्त हीं आपणच नाहीं का संपादन करायचीं? त्यांचं शिक्षण पालकांनीं आपल्याला कसं काय द्यायचं?

**मधुकर :** हं, त्याचं उत्तर मीच देतों. अरे, परवां आपण नाहीं का त्या पुस्तकांत वाचलं, कीं मुलांना शिस्त लावण्याकरितां पालकांनीं आपलं वर्तन चांगलं ठेवलं पाह्यजे म्हणून ? मग पालकच आपलं वर्तन चांगलं ठेवणार नाहींत नि गृहशिक्षण देणार नाहींत, तर आपल्याला तरी चांगलं वळण कसं लागावं ? शाळेपेक्षां घरींच नाहीं का आपण अधिक वेळ असतों नि गृह हेंच नाहीं का शिस्त नि शील ह्यांचें संगोपन करण्याचं स्थळ !

**माधव :** हो, हो ! त्या पुस्तकांतलीं तीं वाक्यें मला अजून आठवतात. गृहशिक्षण हें अत्यंत आवश्यक आहे.

**मधुकर :** आमच्या आरोग्याची, शिक्षणाची, शिस्तीची, शीलाची, सर्व गोष्टींची जबाबदारी शिक्षकांवर जशी आहे, तशीच पालकांवरही आहे, ही गोष्ट अगदीं सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. तेव्हां शिक्षक नि पालक ह्या दोहोंचं सहकार्य असेल तरच आपली उन्नति होणार.

**बंडू :** अरे, पण हें सहकार्य होणार कसं ?

**मधुकर :** त्यासाठींच तर हा उत्सव आहे. ह्या बालदिनासारखे उत्सव हे पालक नि शिक्षक ह्यांचं सहकार्य करण्याकरितांच आहेत. अलीकडे कित्येक शहरांतून ह्याच हेतूनें पालक–शिक्षक–संघही निघत आहेत नि सहकार्याची कल्पना दिवसेंदिवस जनतेला पटूं लागली आहे. आज ह्या बालदिनोत्सवार्थ जमलेल्या पालक-वर्गाजवळ आपण सहकार्यच मागूं या. ह्या बालांकरितां पालक नि शिक्षक हे एकदिलानें सहकार्य करतील, तरच आपली उन्नति होणार आहे. आपलं शिक्षण, शिस्त नि शील ह्यांकरितां उभयतांचं सहकार्य होईल तरच आपण उत्तम नागरिक होऊं.

**बंडू :** तर मग हें सहकार्य व्हावं म्हणून ह्या बालदिनोत्सवप्रसंगीं परमेश्वरानें सर्वांस तशी सद्बुद्धि द्यावी अशी त्याच्याच चरणांशीं प्रार्थना करूं या !

[ चाल : हे प्रभो विभो ऽ ऽ अगाध किति तव करणी ... ]

हे दयाघना ऽ विनंति ही तव चरणीं ॥
करिं सहाय राष्ट्रोद्धरणीं ऽ ऽ ऽ ॥ ध्रु० ॥

हे बाल अज्ञ किति सान
गातात तुझें गुण–गान
वितरुनी कृपा तव छान
करिं प्रभो तयांना सुगुणी ऽ ऽ ॥ १ ॥

ज्ञानातुर बालक झाले
गुरु–जनीं तयां शिकवीलें
हे पालक अमुचे जमले
सहकार्य गोड दे करुनी ऽ ऽ ॥ २ ॥

---

## आ म ची बा ग

[ चाल : आकळे न अघटित घटना ... ]

बाग अहा ! सुंदर फुलली देत मोद ना ?
छान छान पुष्पें असलीं प्रिय हीं जना ॥ ध्रु० ॥

रंग किती छानहि दिसती
पहा कशीं हसती डुलती
खेळुनियां गंमत करिती हृदय–रंजना ॥ १ ॥

# ग्रामोद्धार

[ पात्रें : सुभानराव – शेतकरी, पाटीलबुवा – अधिकारी, अण्णासाहेब – सावकार, वसंतराव – प्रचारक ]

**अण्णासाहेब :** काय रे सुभान्या, आज असा अगदीं नटून थटून कुणीकडे गेला होतास? आतां तुम्ही लोक तर फारच सुधारूं लागलेत!

**सुभानराव :** अण्णासाहेब, आपणांला काय? आज तें व्याख्यान होतं ना? त्याला आम्ही शेतकरी – समदा गांवचा गांवच म्हणाना – तिकडच गेलों होतों.

**अण्णासाहेब :** काय हो पाटीलबुवा, तुमच्या गांवांत ही काय अंदाधुंदी चालली आहे? कसलीं हीं तुम्हीं व्याख्यानं ऐकतां? नि तुम्हांला ह्या व्याख्यानाशीं काय करायचं आहे? वडिलोपार्जित धंदा शेतीसारखा उत्तम असतां इकडे तिकडे कांहीं पाह्यचं कारण काय? 'उत्तम शेती, मध्यम व्यापार नि कनिष्ठ नोकरी" ही म्हण किती सत्य आहे! पण अलीकडे हीं व्याख्यानांचीं सत्रं सुरू झाल्यापासून आमच्या शेतकऱ्यांचीं मनं चंचल होत चाललीं आहेत.

**पाटीलबुवा :** अण्णासाहेब, आपणांपुढें आम्ही काय बोलावं? पुण ते काठी फिरवीत वसंतराव येत आहेत ना? त्यांनाच काय तें विचारा. ते ग्रामसुधारणा-मंडळाचे प्रचारक असून सारखे आमच्या पाठीमागं लागले आहेत. तेच समदं आम्हांला शिकवतात.

[ इतक्यांत वसंतराव येतात. अण्णासाहेब त्यांना नमस्कार करितात. ]

**अण्णासाहेब :** काय वसंतराव, इकडे कुणीकडे? फारा दिवसांनीं तुमची भेट झाली.

**वसंतराव :** आमचा जन्म गरीब विचाऱ्या शेतकऱ्यांकरितां आहे. शेतकरीवर्गांत धंद्याची आवड उत्पन्न करावी, त्यांना शिक्षण देऊन त्यांच्यांत जागृति उत्पन्न करावी, हा आमचा मुख्य उद्देश आहे; तेव्हां आपणां सावकार लोकांपेक्षां ह्या शेतकरीवर्गांतच आमचा काळ जातो झालं !

**अण्णासाहेब :** अहो, पण आम्ही कुठं नाहीं शेतकरी? आमची सुद्धा शेतीच्याच उत्पन्नावर उपजीविका चालते.

**वसंतराव :** अण्णासाहेब, आपल्याला राग येणार नाहीं तर बोलतों.

**अण्णासाहेब :** राग कसला ? नि आमच्या रागाची हल्लींच्या काळांत कोण पर्वा करणार ?

**सुभान्या :** असं कसं म्हणतांव अण्णासाहेब? आम्हासनी तुम्ही रागावलांत म्हणजे कसं कांपरं भरतया ! [ कांपूं लागतो: ]

**अण्णासाहेब :** अरे सुभान्या, मी रागावलों नाहीं. हे वसंतराव तुमचा मोठा कैवार घेऊन बोलतात त्यांची जरा कानउघाडणी तर मला करूं दे ! भिऊं नकोस.

**सुभान्या :** हां जी धनीसाब.

**वसंतराव :** पाह्यलंत अण्णासाहेब ? तुमच्यांत नि आमच्यांत हाच फरक ! आम्ही प्रेमानं ह्या गरीब विचाऱ्या शेतकऱ्यांच्या उन्नतीकरितां झटतों तर तुम्ही धाकानें त्यांचं हृदय चिरून टाकतां !

**अण्णासाहेब :** आपणच असं बोलतां, म्हणून मला आपला जास्त कांहीं बोलतां येत नाहीं; पण आपण तरी त्यांच्याकरितां काय करीत आहां हो? व्याख्यानांची फैर झाडून का कुठं शेतकऱ्यांची सुधारणा होणार आहे ?

**वसंतराव :** आजच आम्ही ग्रामोद्धारावर व्याख्यान करवलं. किती सुंदर नि उपयुक्त माहिती शेतकऱ्यांना मिळाली बरं !

**अण्णासाहेब :** काय हो पाटीलबुवा, तुम्ही कांहींच बोलत नाहीं? हे वसंतराव म्हणतात तें तुम्हांला पटतं काय? काय रे, ह्यांनीं तुमच्या-करितां काय केलं आहे?

**पाटीलबुवा :** आमच्या गांवाचं नांव 'सोनपूर' हें तुम्हांसनी ठाऊक आहेच, पण तें होतं अक्षी वंगाळ! आमच्या वसंतरावांनीं तें जसं काय सोन्यासारखं चकचकीत केलं हाये!

**अण्णासाहेब :** म्हणजे कसं काय? त्यांनीं झाडून साफ केलं होय? का रोजच झाडू घेऊन—पण जास्त बोलत नाहीं, त्यांना उगाच राग यायचा!

**पाटीलबुवा :** तसं न्हव पगा, आमचे वसंतराव अक्षी गोड माणूस! त्यांनीं खरोखरच सुरुवातीला रस्ते झाडल, पण त्येंचं पघून आम्हीं आतां सगळ्यांनींच साफसफाई ही पहिली गोष्ट ध्येनांत ठेवली हाये. आतां आमच्या गांवांत कचरापेटीविगर कचरा कुठच मिळायचा न्हाय बगा!

**अण्णासाहेब :** अस्सं! मग आमची नवी घोडी घेऊन एकदा तुमच्या गांवाला आलंच पाहिजे. आम्ही आपलं काम कारकुनावर सोपवतों. वस्तुस्थितीची खरी कल्पना आम्हांला होत नाहीं.

**वसंतराव :** अहो, आरोग्य हें तर ग्रामोद्धाराचा पाया आहे. आम्हीं त्यांना स्वच्छता, रोगनिवारण, शुद्ध पाण्याचा पुरवठा, दूधदुभत्याची व्यवस्था, गुरांची जोपासना ह्यांविषयीं विशेषेंकरून सांगतों.

**अण्णासाहेब :** पण लोकांना फाजील शिक्षण देऊन सावकार नि कुळं ह्यांच्यामध्यें तंटे तुम्हीच ना उत्पन्न करतां? बोलणार नव्हतों, पण हीं कुळंहीं तुमचीच तारीफ करूं लागलीं; तेव्हां बोलणं भाग पडलं, दुसरं काय?

**वसंतराव :** शिक्षण हें तर सुधारणेचं मूळ साधन आहे. आपली परिस्थिति काय आहे नि ती सुधारावी कशी हें शिक्षणानंच समजतं. 'सहकारिता नि शिक्षण' हें तर ग्रामसुधारणेचं ब्रीदवाक्य आहे.

हा ग्रामसुधारणेचा मूलमंत्र आहे. हा ग्रामसुधारणेचा आत्मा आहे. आम्ही शिक्षणाधिकाऱ्यांशीं सहकारिता करून खेडोपाडीं शिक्षणप्रसार करीत आहों. त्याचप्रमाणें सरकारशीं सहकारिता करून 'सहकारी पतपेढ्या' स्थापन करीत आहों; त्यामुळं दिवसेंदिवस ह्या शेतकऱ्यांचं जीवन स्वावलंबी नि सुखकारक होत आहे. ह्यामुळें सावकार लोकांचा धंदा बसत चालला अगर त्यांना वाढीदिढी करतां येत नाहींशी झाली तर त्याला आमचा नाइलाज आहे! शेतकऱ्यांची सुधारणा हीच आपल्या देशाची सुधारणा होय. आज सरकार नि देशाचे पुढारी हेंच लक्षांत घेऊन ग्रामसुधारणेकडे वळले आहेत.

**अण्णासाहेब :** वसंतराव, आपण तर आम्हांला अगदीं चीतच केलं म्हणायचं! आतां वेड पांघरण्यांत अर्थ नाहीं. आम्ही कांहीं अशिक्षित माणसं नाहीं. आपण म्हणतां हें आम्हांलाही पटतं पण आमचं जीवन ह्या शेतकऱ्यांवर अवलंबून असल्यामुळें आम्हीं तरी काय करावं? थोडासा विरोध करण्याचा मोह आम्हांला पडणं स्वाभाविक नाहीं का?

**वसंतराव :** असं पाहा, आतां भलताच मोह धरण्यांत अर्थ नाहीं. तुमच्याजवळ असलेलं भांडवल तुम्ही सहकारी पतपेढ्या, लहानसहान उद्योगधंदे नि कारखाने ह्यांत गुंतवलं पाहिजे. त्यापासून शेतकरी वर्गाला दुय्यम धंदा मिळून त्यांची उन्नति होईल नि त्याबरोबरच तुमच्या शेतीचीही चांगली जोपासना होईल. आतां त्यांच्यांत जागृति उत्पन्न होत आहे, अशा वेळीं त्यांना अज्ञानांत ठेवण्याचा प्रयत्न करून त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेणं शक्य होणार नाहीं.

**अण्णासाहेब :** ठीक आहे. आजपासून मीं आपल्या ग्रामसुधारणा-मंडळाचा सभासद झालों आहें असं समजा. ह्यापुढें आपल्याबरोबर शेतकरीवर्गाच्या उन्नतीकरितां झटण्याचा मीही प्रयत्न करीन.

**पाटीलबुवा :** वा: वसंतराव! आपण तर लय बहार केलीत! आमच्या अण्णासाहेबांनींबी कबुली दिली, आतां आणखी काय व्हवं?

**सुभान्या :** अण्णासाहेब, राम राम ! आपण आमच्या पोटाकडे बघितलं, आतां झालं आमचं काम ! आम्ही अगदीं तुमच्या भाईर न्हाई समजलांत ! हा सुभान्या त्या शिवाजीवाणी तुम्हा समद्यांकरितां जीवबी द्याया मागें बघणार न्हाई !

**अण्णासाहेब :** अहाहा ! काय हें क्षात्रतेज नि काय ह्या भावना ! ह्या शेतकरी लोकांशीं आपण सहकारितेनें वागलों तर त्यांच्यांत आपलेपणा उत्पन्न होऊन देशाचं कल्याण होईल.

**वसंतराव :** अण्णासाहेब, आपल्याला आतां सर्व गोष्टी पटल्या हें पाहून मला आनंद वाटतो. शेतकरी गरीब असले तरी ते आपले देशबंधूच नव्हत का ?

**पाटीलबुवा :** वसंतराव, ह्येचं सारं श्रेय आपल्याकड बरं का ! परचारांतलं गोड गागं म्हणूनशानी मगच आपण जाऊं या....

**वसंतराव :** अण्णासाहेब, आतां आमच्याबरोबर प्रचारकार्यातील हें मंगल गीत म्हणा म्हणजे आपली प्रतिज्ञा सार्थ होईल.

**अण्णासाहेब :** अरे वा ! ते पाहा आपल्या ग्रामोद्धार-मंडळाचे स्वयंसेवक इकडे येत असून तेंच गाणं म्हणत आहेत.

[ स्वयंसेवक गाणें म्हणत प्रवेश करितात व त्यांचेबरोबर सर्व म्हणतात. ]

( चाल : ये झणि नन्द नन्दना )

**सेविन देशबंधुंना ॥**
**देवासम जनपद हा ऽ**
**मान्य भूवरी जाणा ॥ ध्रु० ॥**
**हीन दीन शेतकरी**
**राष्ट्र जगे त्यांजवरी**
**त्यांच्या जगिं उद्धरणा ।**
**देउं चला निजप्राणा ॥ १ ॥**

# स्त्रियांचें कार्यक्षेत्र

[ **पात्रें :** लीला, कुमुदिनी, वत्सला व विमला ]

**लीला :** काय ग कुमु! स्त्रियांचं कार्यक्षेत्र आतां चूल व मूल हेंच कांहीं राहिलं नाहीं, असं नाहीं का परवां व्याख्यानांत ऐकलंस? मग तुला आतां उच्च शिक्षण घ्यायला नको का? उच्च शिक्षणाशिवाय का पाऊल पुढें पडायचं आहे?

**कुमुदिनी :** काय करायचं आहे उच्च शिक्षण घेऊन? पुरुषांनीं शिकून काय धार मारली आहे? सुशिक्षित पुरुष थोडे का बेकार फिरताहेत नोकरी नाहीं म्हणून!

**लीला :** अग, पण स्त्रियांनीं नोकरीकरतांच शिकायचं असं कोण म्हणतंय्? वाटलं तर पोटाकरतां नोकरी पत्करावी नि स्वतंत्र जीवन कंठावं, नाहींतर सुखानें संसार करावा; पण कांहींही केलं तरी पत्करलेलं कार्य योग्य रीतीनें पार पाडण्याकरतां पुरुषांप्रमाणें स्त्रियाही सुशिक्षित व्हायला पाहिजेतच!

**वत्सला :** खरं आहे लीले! माझंही मत तुझ्याप्रमाणेंच आहे. दिवसेंदिवस स्त्रियांच्या जबाबदाऱ्या वाढताहेत. सार्वजनिक कार्यांतही त्यांना भाग घ्यावा लागत आहे. जागतिक जीवन-कलहांत मानानें जगायचं असलं तर पुरुषांप्रमाणें स्त्रियांनींही उच्च शिक्षण घेऊन आपला दर्जा वाढविला पाहिजे, तरच आपल्या देशाचा तरणोपाय आहे. अलीकडे बऱ्याच स्त्रिया शिक्षण घेत आहेत म्हणा!

**कुमुदिनी :** आतां तुम्ही एकमेकींची साथ करूं लागल्यावर माझा पराजय सहजच होईल! पण आमच्या विमलनें आज अगदींच अबोला

धरलेला 'दिसतोय्! का ती वरच्या वर्गात गेली म्हणून खालच्या वर्गांतील मुलींशीं बोलायचंच नाहीं असा संकल्प करून बसली आहे?

**विमल :** छे बाई! असं कसं ग म्हणतेस? माझं मत असं कीं, आपण शिकावं कीं नाहीं हा वादच निरर्थक आहे! सगळं जग सुशिक्षित झालं आणि आपल्या डोक्यावर नाचूं लागलं तरी आपण आपले असले क्षुल्लक वादच करीत आहोंत! आपलं शिक्षण देशकालपरिस्थितीला जुळतं असावं असं फार तर म्हणा; पण शिकल्या-शिवाय का कुठें आपल्या हातून खरं कार्य होणार आहे?

**कुमुदिनी :** बरं तर, मी सुद्धा आतां कितीही अडचणी आल्या तरी आपलं शिक्षण चालूच ठेवीन.

**विमल :** असं नुसतं बोलूनच आतां भागायचं नाहीं! आपण योग्य शिक्षण घेऊन त्याचा उपयोगही आपल्या समाजाची नि देशाची सेवा करण्याकडेच केला पाहिजे. माझीं मतं जर तुम्हांला पटत असलीं, तर आजच्या आपल्या वाढदिवशीं आपण आपल्या भगिनींना आपणांप्रमाणेंच शिक्षणाची गोडी लावूं व सर्व एकदिलानें वागून देशाची सेवा करूं, असा निश्चय करून तो तडीस नेण्याविषयीं देवाची प्रार्थना करूं या.

[ सर्वजणी पुढील गाणें म्हणतात. ]

[ चाल : योग्य न प्रेमवर्णना ]

**सुंदर कार्य या करूं**
**भारत-भू-प्रेमानें**
**या हृदया पूर्ण भरूं ॥ ध्रु० ॥**
**जन-सेवा नित्य घडो**
**कार्यांतचि देह पडो**
**ध्येय हेंच ठेवुनिया**
**भेद-भाव या विसरूं ॥ १ ॥**

# य शो मा र्ग

[ **पात्रें** : निराशा, आशा, योजना, सुयशा. ]

**निराशा :** काय ग आशे ! तुला ह्या जगांत काय मौज वाटत असेल ती असो, पण मला तर तें अगदीं रूक्ष आणि कंटाळवाणं वाटतं आहे ! आपण यत्न कर कर करावा, परंतु यशाचा वांटा आपल्या पदरीं पडतोच असं नाहीं; उगाच कष्ट करून त्रास मात्र करून घ्यायचा ! त्यापेक्षां खेळून खिदळून मजेंत दिवस काढले, तर आपलं लहानपण तरी आनंदांत जाईल. मला तर वाटतं, हीं अभ्यासाचीं पुस्तकं फेकून द्यावीं झालं ! !

[ चाल : भूपतिवैभव ]

**हं ! खुशाल द्यावी फेकुन पुस्तक-राशी**
**अन् मजत रहावें खेळत या जगताशीं**
**ही शाळा अन् हा ग्रंथांचा अभ्यास**
**हा उगाच गमतो सान मुलींना त्रास**
**हें बरें मनाला वाटे । खेळणें ॥**
**हें बरें वाटतें बागीं । विहरणें ॥**
**हें बरें गायनीं किंवा । रंगणें ॥**
**हं नको झगडणें असलें अभ्यासाशीं**
**हं खुशाल द्यावी फेकुनि पुस्तक-राशी**

[ पुस्तकें फेकून देते. ]

**आशा :** काय निराशे, तुझं नांव अगदींच सार्थ ठेवलेलं दिसतं आहे ! तुला ‘ खेळूं नको, बागेंत रमूं नको, किंवा पेटीवर गाणं म्हणूं नको ’ असं का कुणीं सांगितलं आहे ? पण मनाला कर्तव्योन्मुख ठेवूनच ह्या गोष्टी केल्या पाहिजेत. आपल्या मनाला, बुद्धीला, अंत:करणाला व आत्म्याला अचूक वळण लावणारं शिक्षणाशिवाय अन्य साधन काय आहे बरं ?

आणि शिक्षण जर घ्यायचं, तर शाळा पाहिजे, पुस्तकं पाहिजेत, आपल्या बाई पाहिजेत आणि सर्व कांहीं पाहिजे. असं निराश होऊन कसं बरं चालेल ?

[ चाल : हांस, हांस, हांस, ]

**ज्ञान, ज्ञान ज्ञान, । लोकीं ॥ ध्रु० ॥**
**ज्ञान-बळें जगती चाले**
**ज्ञान-बळें मानव हाले**
**ज्ञान एक देइ आपणां**
**उन्नतीच छान ॥ १ ॥**

**ज्ञान-बळें कर्तव्याचा**
**मार्ग दिसे अपणां साचा**
**ज्ञान एक जीविताचें**
**वाटतें निधान ॥ २ ॥**

**निराशा :** अहाहाहा ऽ! माझ्या निराशामय अंत:करणाला तूं हात घातलास कीं! नको. नको, या, माझ्या ग्रंथमित्रांनो, या; मी नाहीं तुम्हांला अशी फेकून देणार !! (पुस्तकें उचलते.)

[ चाल : सखे मी मुरारी ]

**गमे जीविताचा खरा आसरा**
**न दूर करीं मीं तुम्हांतें जरा ॥ ध्रु० ॥**
**तुम्हां घेउनी मी अशी राहिन**
**फिरुनी फिरुनी तुम्हां पाहिन**
**सदा ज्ञान-पीयूष तें पाझर ॥ १ ॥**

नाहीं, नाहीं; आतां मी तुम्हांला सोडणार नाहीं!

**योजना :** हं, हं, थांब निराशे! तुझं हृदय किती भावनामय आहे! क्षणांत तुझ्या हृदयांत किती बरं बदल झाला! ईश्वरी कृपाच म्हणायची ही! ह्या ग्रंथ-मित्रांना जवळ करतांना त्यांची योजना नीट करीत

जा बरं. केव्हां कोणत्या मित्रांचा सहवास करावा हें नीट ठरवावं लागतं ! आणि तशांत भावना-प्रधान माणसानें तर जास्तच विचार केला पाहिजे. जसं शरीर-संवर्धनाकरतां आपण भिन्नभिन्न पदार्थ खातों, तसंच आपल्या मनाला, बुद्धीला, अंतःकरणाला व आत्म्याला वळण लावण्याकरतां ग्रंथमित्रांची निवडसुद्धा नीट केली पाहिजे. गुरु-जनांच्या मार्गदर्शनाखालीं आपण नीट निवड करून त्यांना जवळ केलं पाहिजे. म्हणजे ते खरोखर आपल्या जीविताचे खरे मित्र होतात.

'साउदे' ह्या आंग्लकवीच्या 'माय फ्रेंड्स्' ह्या कवितेचं रूपान्तर कवि कामत ह्यांनीं केलेलं मीं मासिकांत वाचलं आहे. त्यांत ग्रंथ-मित्रांचं रहस्यमय वर्णन किती बहारीचं केलेलं आहे. त्यांतील एकदोन कडवीं म्हटल्याशिवाय मला राहावत नाहीं.

[ चाल : आनंदी आनंद ]

**मित्र जिवाचे कोण असे**
**हृदयीं भरले प्रेमरसें ॥ ध्रु० ॥**
**आनंदानें मोदानें**
**सदा वाढत्या प्रेमानें**
**माझ्यासंगें हे वसती**
**हांसत खेळत हे रमती**
**एकांतीं वा लोकांतीं**
**माझे असती सांगाती**
**मातें यापरि**
**हे सहकारी**
**प्रेमळ अंतरिं**
**अहा लाभले तरी कसे**
**मीच जगीं या धन्य दिसें ॥ १ ॥**

नको गालिचा लोड मऊ
नको म्हणाया 'या भाऊ'
नको तयांना गरम चहा
पानसुपारी विडा पहा
मान-मरातब वरवरले
नको तयांना हे असले
खरें जिवाचें
अंतरंगिंचें
प्रेमच साचें
हवें तयांना तें खासें
खरा मित्र तो त्यां भासे ॥ २ ॥

करीं धरुनियां मग त्यांना
शीण देउनी नयनांना
अंतरंग त्यांचें पाहीं
चित्त देउनि त्या ठायीं
जगत् अखिलही मी विसरें
देहाभानही मजसि नुरे
एकतानता
होतां होतां
निजानंदता
यांच्या संगें लाभतसे
ज्ञानोदय तो खरा दिसे ॥ ३ ॥

हें गाणं फारच मोठं आहे, केव्हांतरी मी सगळं म्हणून दाखवीन बरं का !

**सुयशा :** माझ्या सख्या आशा व योजना ह्यांनीं, निराशे, तुझी निराशा पार वितळून लावलीच आहे ! ही सुयशा नांवाप्रमाणें आहे असं लोक म्हणतात आणि तिनेंही ह्या मित्रांचा चिरकाल सहवास केलेला आहे.

इतकंच नव्हे तर त्यांच्याबरोबर दीर्घोद्योग, सदभिरुचि, ज्ञानलालसा, सच्छील इत्यादि मित्र-मैत्रिणींनाही हिनें जवळ केलेलं आहे. म्हणूनच कोणत्याही कार्यांत सुयश हिला मिळालेलं तुला दिसतं. तेव्हां आपण सर्वजणी परस्पर सहकार्यानें यशोमार्ग आक्रमण करूं या !

[ चाल : भूल कशी पडली ]

**सुंदर सुखदायी जगीं या ॥**
**ज्ञान-पंथ हा प्रेमें क्रमुं या ॥ ध्रु० ॥**
**आशामय हें**
**जीवन अपुलें**
**करिल सार्थ तो**
**जगिं प्रभुराया ॥ १ ॥**

---

## गं म त !

[ चाल : मी नव बाला... ]

**गंमत गमते ही जगताची ॥**
**बाल मनातें रमवी साची ॥ ध्रु० ॥**
**फुलें विकसती, किंचित् हसती**
**सेवा करिती हीं रसिकांची ॥ १ ॥**

**वर्षाकालीं भरे निर्झरी**
**वाढवि शोभा हासत वनिंची ॥ २ ॥**

**आपण हासवुं यापरि जगता**
**जाणिव ठेवुनि कर्तव्याची ॥ ३ ॥**

---

— ११ —

# अस्पृश्यता–निर्मूलन

[ पात्रें : १ सुमति. २ सुधा. ३ सुकेशा. ४ सुषमा. ५ सुकला. ]

[ सुमति–अस्पृश्य मुलगी व सुधा तिची मैत्रीण प्रवेश करितात. ]

**सुमति :** काय सुधे ! किती पण सुंदरपणा तुझा, आपणाला सुशिक्षित म्हणवितेस, पण भर मंडईत 'दूर हो ! दूर हो !' म्हणून माझा कसा ग पाणउतारा केलास ! इश्श ! काय बाई तुमची ही रीत !

**सुधा :** सुमति, अशी रागावूं नकोस. मी बोलून चालून सुधा, अमृतासारखी गोड ! पण करूं काय ? त्या साळकाया-माळकायांचा घोळका माझ्या सभोवार होता ना ? त्या सगळ्या कट्टर सनातनी !

**सुमति :** अस्सं ! दाखवायचं एक व करायचं एक, असाच का जगाचा व्यवहार आहे ? मला साधी भोळीला ग काय हें ठाऊक ! मला वाटलं तूं माझ्याबरोबर हायस्कूलमध्यें शिक्षण घेतेस व समतेच्या गोष्टी सांगतेस तशीच नेहमीं वागत असशील !

**सुधा :** होय, वागेन हां ह्यापुढें ! माझ्या अंतःकरणांत तुझ्याबद्दल किती प्रेम आहे तें काय सांगूं ! माझ्यापेक्षां त्या नवीनच हायस्कूलमध्यें आलेल्या सुकेशा, सुषमा व सुकला कशा आहेत हें नाहीं तुला ठाऊक ! काय बाई त्यांचा नखरा आणि काय बाई त्यांचा तोरा !

[ इतक्यांत सुकेशा, सुषमा व सुकला प्रवेश करितात. ]

**सुकेशा :** ( वेणी पाठीवर मोकळी सोडलेली व ऐटदार पोषाख केलेली ) हं ! आमचा नखरा तुमच्या डोळ्यांत खुपूं लागला वाटतं ? हायस्कूलमध्यें येऊन तुम्हांला चार चार वर्षं झालीं, तरी वागावं कसं हेंच कळत नाहीं !

**सुषमा :** ( तसाच अप्-टु-डेट ड्रेस केलेली ) आजकाल पोषाखाला किती महत्त्व असतं हें सुधेला अजून समजूं नये ? हं !

**सुकला :** हल्लीं सगळी कला नटण्यामुरडण्यांतच भरलेली आहे, बरं का ! मला तरी सुकला नांव कां पडलं, तर मी फॅशनच्या कलेंत निष्णात आहें म्हणूनच !

**सुधा :** माझा साधेपणा आणि सुमतीबरोबर मैत्री हीं तुम्हांस खपत नाहींत हें आम्हांला ठाऊक नाहीं थोडंच !

**सुकेशा :** ( किंचित् रागावून ) मग काय तुझं म्हणणं आहे सुधे ? ह्या सुमतीच्या नादानें तूं आपला धर्म सोडला आहेस धर्म, समजलीस !

**सुधा :** धर्म सोडला ? तो ग कसा ? सुमति हुशार आहे, निर्मळ आहे, सदाचरणी आहे, मग तिला दूर दूर कां करतां अशा ?

**सुषमा :** तूं नाहीं का तिला केव्हां केव्हां दूर करीत ? मग आम्हांलाच कां दूषण ? अस्पृश्य ती अस्पृश्यच !

**सुधा :** मी तिला एखादे वेळींच दूर ठेवीत असेन, पण तुम्ही तिला एकसारखीच दूर दूर ठेवतां, त्यामुळें तिला काय वाटतं ह्याची कल्पना तुम्हांला कुठून असणार ?

**सुमति :** खरंच सांगूं का तुम्हांला, मला त्या वेळीं काय वाटतं तें ? पण मीं सांगण्यापेक्षां जगन्नाथसुत ह्यांची 'अस्पृश्याची कहाणी' ही कविता वाचा म्हणजे तुम्हांला जास्त पटेल.

**सुधा :** सुमते, तूंच म्हणस ना ती कविता. तुझा गळा खरंच किती गोड आहे !

**सुमति :** ( 'अस्पृश्याची कहाणी' हें पद गाऊं लागते; सगळ्या नीट लक्षपूर्वक ऐकतात. )

## अस्पृश्याची कहाणी

[ जाति : चंद्रकांत ]

**दूर दूर कां मला लोटितां बंधूभगिनींनो ! ॥**
**असें हिंदु मी, असें आर्य मी, विचारवंतांनो ! ॥ ध्रु० ॥**
**दूर लोटुनी हृदय करितसां दुभंग हें माझें**
**तट तट तुकडे होती तेव्हां प्रेम-बंधनाचे**
**कुठें उरे ती सहानुभूति ? कुठलें राष्ट्रैक्य ?**
**कुठें हिंदुंचें संघट्टण तें ? कुठें उरे सख्य ?**
**उरे मात्र ती हृदयीं ज्वाला स्पर्शास्पर्शाची**
**दूर ठेवणें एक असे त्या ठिणगी ज्वालेची**
**आर्य-हृदय हें पाहुनि असलें धरवे ना धीर**
**दुःखावेगें गळे निरंतर नयनांतुनि नीर ॥ १ ॥**

[ डोळ्यांत अश्रु येतात. ]

**सुकेशा :** इतकं का बाई ह्या अस्पृश्यांचं हृदय कोवळं असतं !

**सुषमा :** इतका ह्यांना त्रास होतो !

**सुकला :** काय बाई तरी हा जुलूम !

**सुधा :** खरंच बाई, हें गीत काळजाचं पाणी पाणी करणारं आहे ! नको, नको, पुन्हा तें आम्हांला ऐकायला नको ! अस्पृश्यतेचा कलंक धुतला गेलाच पाहिजे असं आतां आम्हांला सुद्धा वाटूं लागलं आहे, बरं का ! पण काय ग, सध्या बाजारांत, व्यवहारांत, दरबारांत, अस्पृश्यता आहे तरी कुठें ?

**सुमति :** पण घरांत...

**सुकेशा :** ( वेणीचा गोंडा फडकावीत जरा तोऱ्यांत ) पण घरांत... कोण ग बाई हिला घेणार ?

**सुषमा :** आणि व्यवहारांत तरी कशी ग बाई सगळीकडे चालणार ?

**सुकला :** आणि बाजारांत तर सुधाच नाहीं का म्हणाली, 'दूर हो, दूर हो,' म्हणून !

**सुधा :** हं, हं, पुरे करा आतां ! तुमच्या अशा वल्गनांनींच सगळी घाण होते ! आपल्या मोठ्या बाई आपणांला नेहमीं नाहीं का सांगत, कीं अस्पृश्यता हा हिंदुधर्मावरीलच नव्हे, तर मानव-जातीवरील कलंक असून त्याचं निर्मूलन झालंच पाहिजे. आपल्या देशाचे पुढारीही हेंच सांगतात. महात्मा गांधींनीं तर मागें आत्मबलिदान करण्याची तयारी नाहीं का दाखविली ?

**सुकेशा :** खरंच सांगूं का सुधे ? सगळं कळतं पण वळत मात्र नाहीं, अशांतली गत झाली आहे ही !

**सुषमा :** खरंच, मला पण तसंच वाटतं !

**सुकला :** अगदीं बरोबर ! पण काय ग सुधे, आपले पूर्वज काय वेडे होते, म्हणून त्यांनीं ही अस्पृश्यता निर्माण केली ? जी आज हजारों वर्षं टिकली आहे, ती अगदीं निराधार आहे, तींत कांहींच अर्थ नाहीं असं कसं म्हणतेस ?

**सुधा :** बरं विचारलंस ! त्याचं असं आहे, मनुस्मृतीच्या कालीं समाज-धारणेच्या उद्देशानें व तत्कालीन आचार-विचार पाहून हीं समाज-बंधनं निर्माण झालीं. परंतु आतां समाजाची परिस्थिति बदललेली आहे, त्यांची राहणी पालटत आहे, त्यांच्यांत शिक्षणाचा फैलाव होत आहे, आरोग्यदृष्ट्या आपण कसं वागलं पाहिजे तें त्यांना समजूं लागलं आहे, इतकं कशाला ? देशाच्या राज्यकारभारांतही त्यांना बरोबरीचे हक्क मिळाले आहेत, अशा वेळीं आपण त्यांना दूर लोटणं शहाणपणाचं होईल का ? अस्पृश्यतेमुळें आपला समाज दुभंग झालेला असून त्याची राजकीय व धार्मिक अवनतीच झालेली आहे व होत आहे, नाहीं का ?

**सुकला :** वा सुधे, मोठी पंडिताच झाली आहेस कीं ! केवढीं धाडसाचीं विधानं हीं ! कांहीं बायकांना लहान तोंडीं मोठा घास घेण्याची संवय असते असं म्हणतात, तें खोटं नाहीं ! काय ग, तूं धर्मशास्त्राचा अभ्यास केला आहेस वाटतं ? समाजशास्त्र कशाशीं खातात हें तरी तुला ठाऊक आहे का ? मग कां उगीच असलं बोलणं ?

**सुधा :** सुकले, सगळ्यांनाच सगळे ग्रंथ वाचणं शक्य नाहीं, समजलीस ? तथापि मीं ह्याचा चांगला विचार केला आहे. तुमची जर आमच्या विचारवंत पुढाऱ्यांवर श्रद्धाच नसेल तर देशाचं आणि धर्माचं दुर्दैव ! दुसरं काय ?

**सुमति :** महात्माजी, आपणांस त्रिवार वंदन असो ! अद्यापिही माझ्या बंधुभगिनींना आमच्यासंबंधानें अनादरच वाटावा ना ? आम्ही सुशिक्षित झालों, आम्हीं आमचे आचार सुधारले, आम्ही नीतिधर्माचं पालन करूं लागलों, आम्हीं हिंदु-समाजाची अनंत वर्षं अवहेलना सोसूनही त्याची निष्काम सेवा केली, उष्ट्या अन्नावर पोटाची आग शमवली, आमची पायपोसाइतकीही कोणी किंमत ठेवीत नसतांना देव देव म्हणून सर्वांना वंदन केलं, पण परमेश्वरा, अद्यापि आमची अंत:शुद्धि झाली नाहीं ना ? देवा, आतां कधीं रे आमच्याकडे पाहाणार.... ( मूर्च्छित पडते. )

**सुधा :** धावा, धावा ! हें काय ग सुमते ! ( ( सुकला पाणी आणते, सुषमा वारा घालते, सुकेशा डोक्यावर पाणी शिंपडते व सुधा तिला मांडीवर घेऊन हातरुमालानें तोंड पुसते. )

**सुमति :** ( थोड्या वेळानें सावध होऊन ) हं ! दूर व्हा ग सगळ्या ! मी अस्पृश्य आहें, आपण मला शिवूं नका, मी अस्पृश्य आहें !

[ वेड्यासारखी पाहूं लागते. ]

**सुधा :** ( मिठी मारून ) सावध हो. सावध हो ! तूं माझी बहीण आहेस, अस्पृश्यता आतां हिंदुसमाजांतून नष्ट झाली आहे !

**सुकेशा :** सुमते, सावध हो. तुझ्या कोमल हृदयाला इतका जबरदस्त धक्का बसत असेल, ही कल्पना वरच्या समाजांत वावरणाऱ्या आम्हांला कोठून असणार ?

**सुषमा :** मी तर ह्यापुढें सुमतीला माझी बहीण म्हणूनच मानणार !

**सुकेशा :** मानवतेला धक्का देणारी ही 'अस्पृश्यता समाजांतून गेलीच पाहिजे.

**सुकला :** मीही ह्यापुढें बाह्य सौंदर्याकडे लक्ष देण्यापेक्षां अंतःसौंदर्या-कडेच अधिक पाहाणार ! ये सुमते, ये. तूं आमची सर्वांची बहीणच आहेस, बरं का !

**सुमति :** काय मी सर्वांची ? सर्व हिंदु समाजाची ? अहाहा काय हा सुदिन !

( धन्यतेचे अश्रु डोळ्यांत चमकूं लागतात. ) देवा, शेवटीं तूं धावलास ना ! ( चांगली शुद्धीवर येते. )

[ **सुमति** प्रस्तुत पद म्हणून ईशस्तवन करते. ]

**पद**

( चाल : यमुनाजळिं खेळूं खेळ )

**करुणा-घन दीन-सखा हा प्रभुराजा पावला ॥ ध्रु० ॥**
**आली तयाला ममता**
**विजयी दिसे ही समता**
**अहा ! मोद मनाला ॥ १ ॥**

**धर्म आतां खास कळला**
**जागृतीचा काळ आला**
**प्रभुरा ऽ या**
**आनंदें नमितों तव पदां प्रभुराया पावला ॥ २ ॥**

**सुधा :** देव तर धावला व पावलाही ! पण कोणाला ! आम्हां स्पृश्य हिंदूंनाच ! कारण त्यानें दीर्घकालानें कां होईना, पण आमचे नेत्र उघडले ! आमच्या घोडचुका आम्हांस दाखविल्या व आम्हांस एकीचा आणि उन्नतीचा मार्ग दिसूं लागला !

**सुमति :** ह्या वसंत ऋतूमध्यें आपल्या विमल विचारानें ही चराचर सृष्टि अधिक आनंदमय दिसत आहे ! सृष्टीमध्यें दिसणारा आनंद हा समतेच्या व स्वातंत्र्याच्या पायावर अधिष्ठित झालेला असतो, त्या सृष्टीचं अनुकरण आपण मानव जातीनें केल्यास आपलंही जीवन आनंदमय होणार नाहीं का ?

**सुधा :** अग हा वसंतऋतु आणि वासंतीदेवीचंच पूजन करून आपण हळदीकुंकू समारंभ साजरा करीत नाहीं का ? मग तिच्या मंगल आशीर्वादानें पावन होण्याकरितां तिचंच स्तवन, गान नि पूजन करूं या आणि तिच्याच चरणांशीं आपली समता प्रगट करूं या.

[ वासंतीदेवीचें स्तवन व पूजन करितात ; गुलाल व फुलें उधळतात. ]

[ सर्वजणी एकत्र गाऊं लागतात. ]

[ नाचत टिपऱ्यांवर म्हणावयाचें. ]

[ **चाल** : हांसवि, नाचवि हृदयाला. ]

**हासत हासत हा आला ॥**
**या वसंत म्हणती सखयाला ॥ ध्रु० ॥**
**मञ्जुल मञ्जुल रव उठला**
**करिति कोकिला गानाला**
**सूर गोड ये समता, समता ॥**
**आनंदें देवेंद्रहि धाला ॥ १ ॥**

## बालवीर शिक्षण

[ एक बालवीर-पथक व कांहीं मुलें प्रवेश करितात. ]

**यशवंत :** ओ हो हो हो ! ! काय हा लष्करी थाट ! त्या पाश्चात्य रणभूमीवर रणधुमाळी माजली आहे, तिकडे जाण्याचा विचार आहे वाटतं ? पण काय रे, ह्या काठ्या का लाठ्या घेऊन तुम्ही लढाई कशी जिंकणार ?

**बालवीर :** छे ! छे ! असं कांहीं तरी म्हणूं नको. आमचा पोषाख पाहून एकदम असा समज होण्याचा संभव आहे म्हणा ; पण असा आमचा आज हेतु नाहीं. आम्ही बालवीर आहों !

**सदानंद :** काय रे यशवंत, ह्यांनीं कुठें पराक्रम गाजवल्याचं आमच्या तर ऐकण्यांत नाहीं, मग ह्यांनीं ही आपणच घेतलेली पदवी दिसते !

**बालवीर :** बालवीर ही पदवी नाहीं, किंवा आम्ही कुठें पराक्रमही गाजवलेला नाहीं. आम्ही सध्या बालवीर-शिक्षण घेत आहों.

**यशवंत :** म्हणजे आम्ही जसं शाळेंत शिक्षण घेतों, तसंच हें शिक्षण आहे वाटतं ? मग हें इतकं अगदीं विशिष्ट पोषाखांतच कां घेतां ? व ह्याचा हेतु तरी काय ?

**बालवीर :** हं, चांगला प्रश्न विचारलांत. शिक्षणाचा हेतु सफल होण्याच्या दृष्टीनें विशिष्ट पोषाख व विशिष्ट पद्धति हीं स्वीकारावीं लागतात.

ह्या शिक्षणाचा मूळ उत्पादक सर रॉबर्ट बेडन पॉवेल हा होय. बोअर युद्धाच्या वेळीं जेव्हां उत्तम शील व शिस्त असलेल्या तरुण स्वयंसेवकांची उणीव दिसून आली, त्या वेळीं त्यानें ह्या शिक्षणाचा प्रसार करण्याची योजना काढली. हें शिक्षण स्वतःचा धर्मपंथ व राष्ट्र

ह्यांना पोषकच होऊन तरुणांमध्यें शिस्त व शील उत्पन्न करतें व त्यांचा मर्दपणा वाढवितें.

**मनोहर :** काय हो ? पण आपल्याकडे ह्याचं अलीकडेच इतकं प्रस्थ कां माजलं आहे ? मला वाटतं मुलांना ऐटीनें फिरायला व उनाडायला मिळतं म्हणून तुमच्यासारख्यांनीं बालवीर-शिक्षणाचा हा पेशा पत्करला आहे झालं !

**बालवीर :** छे; छे, असं म्हणूं नकोस, मनोहर, आपल्या देशाला तर ह्या शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. शाळांमधून एकांगी बौद्धिक शिक्षण मिळत असतं, त्याला ह्या शिक्षणाची जोड दिल्यानें उत्तम नागरिक तयार होतील आणि ह्याच सद्धेतूनें आपल्या देशांतील पुढाऱ्यांनीं 'हिंदुस्थान स्काउट असोसिएशन' ही संस्था स्थापन केली आहे नि ह्या संस्थेकडूनच हीं बालवीर-पथकं चालत आहेत. आपल्या देशाच्या उज्ज्वल भवितव्याचं बीज प्रस्तुत बालवीर-शिक्षणांतच सांठवलेलें आहे हें पक्कं समज. ( इतक्यांत एक प्रवासी वाटेनें जातो, त्याची पैशाची थैली पडते व ती बालवीर उचलतो. )

**यशवंत :** ह्या बालवीर-शिक्षणाचं मूळ तत्त्व तरी काय ? व बालवीर तरी कुणाला म्हणावं ?

**बालवीर :** समता, बंधुता व स्वतंत्रता हेंच तत्त्व प्रस्तुत शिक्षणांत अंतर्हित आहे व तदनुषंगानेंच शिक्षण-योजना आहे. बालवीर-प्रतिज्ञा व नियम हीं ज्यांत सुंदर रीतीनें गोविलीं आहेत असें एक गाणेंच मी तुम्हांला गाऊन दाखवितों, म्हणजे ह्याची अचुक कल्पना तुम्हांला येईल.

[ चाल—उद्यां बघ जातें ... ]

**तया सुजनातें । बालवीर पद हें मिळतें ॥ ध्रु० ॥**
**सत्य–वचन–पालन जो करितो**
**थोरांविषयीं आदर धरितो**
**परोपकारा करीत जातो**
**तया सुजनातें ॥ १ ॥**

प्रेम बंधुसम वसे अंतरीं
विनयशीलता विलसे ती खरी
भूतदयेची हृदयिं माधुरी
तया सुजनातें ॥ २ ॥

आज्ञापालन अखंड करुनी
धैर्य अंतरीं संतत धरुनी
मितव्ययाचें ब्रीद पाळुनी
राही त्यातें ॥ ३ ॥

पावित्र्याचा मंगल ठेवा
ज्याच्या वर्तनिं सदा असावा
शासनसंस्था-स्वदेश-सेवा
भजतों त्यातें ॥ ४ ॥

**यशवंत :** अहाहा ! तत्त्वं तर उच्च आहेत ह्यांत शंकाच नाहीं !

[ इतक्यांत तो प्रवासी येतो. ]

**प्रवासी :** काय हो, आपणांला इथं कांहीं सांपडलं आहे का ?

**बालवीर :** तुमचं काय सांडलंय् ?

**प्रवासी :** अहो, पैशाची थैली. कशी पडली कुणास ठाऊक, मी आपला आहें जरा धांदरटच म्हणा.

**यशवंत :** अहो, पैशाची पिशवी का कोण परत देईल ?

**बालवीर :** असे घाबरूं नका. तुमचं नांव काय ? त्या पिशवीला कांहीं खूण आहे का ?

**प्रवासी :** अहो, माझं नांव विसरे, त्या पिशवीवर माझं नांव आहे, बरं का ?

**बालवीर :** विसरे ? मग आठवण कशी झाली ? बरं घ्या तर ही ! आम्ही बालवीर आहों. सत्यवचन व प्रामाणिकपणा हें आमचं ब्रीद आहे.

[ ' बालवीराचा जयजयकार असो ! ' असें म्हणून प्रवासी नमस्कार करून निघून जातो. ]

**सदानंद :** यशवंत, पाहिलंस ? ह्याला म्हणावं बालवीर !

[ इतक्यांत ' पडलों पडलों ! ' अशी आरोळी ऐकूं येते. पथकनेता शिटी वाजवितो, सर्व बालवीर त्या दिशेनें चालूं लागतात व थोड्या वेळानें बांधलेल्या वृद्ध मनुष्यास घेऊन प्रवेश करितात. ]

[ सर्व मुलें प्रवेश करतात. ]

**पथकनेता :** ( बालवीरांकडे पाहून ) आपण एकाएकीं आरोळी ऐकून धावत गेलों हें किती ठीक झालं बरं ! नाहीं तर हा तसाच पडून राहता ! ह्याला आपण प्रथमोपचार केलेले आहेत, आतां ह्याला हळूहळू दवाखान्यांत घेऊन चला. (एक अगर दोन बालवीर त्याला घेऊन जातात.)

[ स्ट्रेचरवर व्यवस्था होण्यासारखी असल्यास पाय दुखावलेला आहे असें दाखवावें, नाहींतर हात दुखावलेला आहे असें दाखवावे.

**यशवंत :** बालवीरांनो, तुम्ही जर गेलां नसतां, तर त्या म्हाताऱ्याची जखम तशीच वाहात राहती व त्याला उठवलं नसतं ! तुमच्या शिक्षणांत प्रासंगिक अशा सर्व गोष्टींचा अंतर्भाव केलेला दिसतो. परोपकार व बंधु-प्रेम हीं तर आतांच दिसून आलीं !

[ इतक्यांत एक आंधळा ' वाट चुकलों रे वाट चुकलों ' असें ओरडत येतो, बालवीरपथकाचा नेता शिटी वाजवितो, तेव्हां एक बालवीर आपल्या काठीचा आधार देऊन त्याला घेऊन जातो. ]

**यशवंत :** बालवीर-शिक्षणाची सामान्य कल्पना आम्हांला आलेली आहे. आमचीही इच्छा बालवीर-पथकांत आपलीं नांवं दाखल करण्याची आहे.

**सदानंद :** यशवंत, आपण सर्वांनींच बालवीर-शिक्षण घ्यावं असं मलाही वाटतं. अगदीं स्वतंत्र पथकच आपलं तयार होईल.

**मनोहर :** ह्यांत काय संशय! अशी शिस्त आणि असे गुण आपल्याला आंगीं आणलेच पाहिजेत, म्हणजे आम्ही खरे बालवीर होऊं.

**बालवीर :** अगदीं बरोबर, समजलास! ह्या सामान्य सद्गुणांबरोबर प्रसंगीं लागणारं धैर्य नि धाडस, समरांगणीं लागणारं शौर्य नि साहस आणि स्वदेशाविषयीं अलोट प्रेम नि स्वाभिमान ह्या अलौकिक सद्गुणांचाही अंतर्भाव प्रस्तुत शिक्षणांत होतो. श्रीशिवाजीमहाराज व राणा प्रताप हे तर खरे खरे बालवीर होऊन गेले!

**मनोहर :** मग आम्ही आपल्या पथकाला 'शिवाजी–पथक' असंच नांव देऊं.

**पथकनेता :** एकदम आनंद! बालवीरशिक्षणाचा प्रसार जितका होईल तितका आम्हांला पाहिजे आहे.

[ इतक्यांत गेलेले सर्व बालवीर परत येतात. ]

**पथकनेता :** काय, त्या पडलेल्या वृद्ध मनुष्याची सर्व व्यवस्था झाली?

**बालवीर :** होय, तो आतां बरा आहे, त्याची सर्व व्यवस्था करून आलों.

**पथकनेता :** आणि त्या अंध गृहस्थाचं काय?

**बालवीर :** त्याला घरीं पोचवून परत आलों.

**पथकनेता :** ठीक, ठीक! समाजसेवा व परोपकार ह्यांकडे साध्या गोष्टींतही आपणांस लक्ष दिलं पाहिजे. मला तुम्हांला सांगायला आनंद वाटतो कीं, आजपासून ह्या आपल्या खेळगड्यांचं नवं 'शिवाजी–पथक' आपण सुरू करणार आहों, तेव्हां आपण सर्व श्रीशिवाजीमहाराजांचं स्मरण करून नंतर ध्वज-वंदन करूं या.

[ ' बालवीराचा जयजयकार असो ! ' असें म्हणून प्रवासी नमस्कार करून निघून जातो. ]

**सदानंद :** यशवंत, पाहिलंस ? ह्याला म्हणावं बालवीर !

[ इतक्यांत ' पडलों पडलों ! ' अशी आरोळी ऐकूं येते. पथकनेता शिटी वाजवितो, सर्व बालवीर त्या दिशेनें चालूं लागतात व थोड्या वेळानें बांधलेल्या वृद्ध मनुष्यास घेऊन प्रवेश करितात. ]

[ सर्व मुलें प्रवेश करतात. ]

**पथकनेता :** ( बालवीरांकडे पाहून ) आपण एकाएकीं आरोळी ऐकून धावत गेलों हें किती ठीक झालं बरं ! नाहीं तर हा तसाच पडून राहता ! ह्याला आपण प्रथमोपचार केलेले आहेत, आतां ह्याला हळूहळू दवाखान्यांत घेऊन चला. ( एक अगर दोन बालवीर त्याला घेऊन जातात. )

[ स्ट्रेचरवर व्यवस्था होण्यासारखी असल्यास पाय दुखावलेला आहे असें दाखवावें, नाहींतर हात दुखावलेला आहे असें दाखवावे.

**यशवंत :** बालवीरांनो, तुम्ही जर गेलां नसतां, तर त्या म्हाताऱ्याची जखम तशीच वाहात राहती व त्याला उठवलं नसतं ! तुमच्या शिक्षणांत प्रासंगिक अशा सर्व गोष्टींचा अंतर्भाव केलेला दिसतो. परोपकार व बंधु-प्रेम हीं तर आतांच दिसून आलीं !

[ इतक्यांत एक आंधळा ' वाट चुकलों रे वाट चुकलों ' असें ओरडत येतो, बालवीरपथकाचा नेता शिटी वाजवितो, तेव्हां एक बालवीर आपल्या काठीचा आधार देऊन त्याला घेऊन जातो. ]

**यशवंत :** बालवीर-शिक्षणाची सामान्य कल्पना आम्हांला आलेली आहे. आमचीही इच्छा बालवीर-पथकांत आपलीं नांवं दाखल करण्याची आहे.

**सदानंद :** यशवंत, आपण सर्वांनींच बालवीर-शिक्षण घ्यावं असं मलाहीं वाटतं. अगदीं स्वतंत्र पथकच आपलं तयार होईल.

**मनोहर :** ह्यांत काय संशय! अशी शिस्त आणि असे गुण आपल्याला आंगीं आणलेच पाहिजेत, म्हणजे आम्ही खरे बालवीर होऊं.

**बालवीर :** अगदीं बरोबर, समजलास! ह्या सामान्य सद्गुणांबरोबर प्रसंगीं लागणारं धैर्य नि धाडस, समरांगणीं लागणारं शौर्य नि साहस आणि स्वदेशाविषयीं अलोट प्रेम नि स्वाभिमान ह्या अलौकिक सद्गुणांचाही अंतर्भाव प्रस्तुत शिक्षणांत होतो. श्रीशिवाजीमहाराज व राणा प्रताप हे तर खरे खरे बालवीर होऊन गेले!

**मनोहर :** मग आम्ही आपल्या पथकाला 'शिवाजी–पथक' असंच नांव देऊं.

**पथकनेता :** एकदम आनंद! बालवीरशिक्षणाचा प्रसार जितका होईल तितका आम्हांला पाहिजे आहे.

[ इतक्यांत गेलेले सर्व बालवीर परत येतात. ]

**पथकनेता :** काय, त्या पडलेल्या वृद्ध मनुष्याची सर्व व्यवस्था झाली?

**बालवीर :** होय, तो आतां बरा आहे, त्याची सर्व व्यवस्था करून आलों.

**पथकनेता :** आणि त्या अंध गृहस्थाचं काय?

**बालवीर :** त्याला घरीं पोचवून परत आलों.

**पथकनेता :** ठीक, ठीक! समाजसेवा व परोपकार ह्यांकडे साध्य गोष्टींतही आपणांस लक्ष दिलं पाहिजे. मला तुम्हांला सांगायला आनंद वाटतो कीं, आजपासून ह्या आपल्या खेळगड्यांचं नवं 'शिवाजी–पथक' आपण सुरू करणार आहों, तेव्हां आपण सर्व श्रीशिवाजीमहाराजांचं स्मरण करून नंतर ध्वज-वंदन करूं या.

[ सर्व पुढील पद गाऊं लागतात. ]

**होऊं, बालवीर होऊं ॥**
**शिवराजगुणां गाऊं ॥ ध्रु० ॥**
**शिवरायाची पुण्यभूमि ही**
**हिंदमाय सेवूं ॥ १ ॥**
**पूर्ववैभवें भारतमाता**
**पराक्रमें सजवूं ॥ २ ॥**
**जनसेवेन आत्मबलानें ॥**
**विभव पुन्हा मिळवूं ॥ ३ ॥**
**पुण्यशालि ही अमुची माता ॥**
**सुखासनीं बसवूं ॥ ४ ॥**

( 'वंदे मातरम्' असा त्रिवार जयघोष करितात; नंतर 'जनगणमन' हें बालवीर गीत म्हणून ध्वजवंदन केल्यावर सर्व शिस्तीनें मार्चिंग करीत जातात. )

**सूचना** — प्रस्तुत संवाद हा 'कँप फायर' चे वेळीं उघड्या मैदानावर करण्याचा आहे. बालवीर प्रश्नांचीं उत्तरें देत आहे, अशा वेळीं एकच बालवीर न घेतां सोयीप्रमाणें अधिक बालवीरांचा समावेश संवादांत करावा.

# समाज — सेवा

## प्रवेश पहिला

[ **स्थळ :** दिवाणखाना. समोर राष्ट्रदेवतेची स्थापना केलेली आहे, सभा स्त्रियांनीं फुलून गेलेली आहे, स्वयंसेविका केशरी पातळें नेसून स्वागतार्थ उभ्या आहेत, राष्ट्रीय झेंडा — तिरंगी निशाण — फडकत आहे. ]

[ पात्रें : १ प्रभावती — स्वयंसेविका. २ शीलवती — तिची मैत्रीण. ३ वासंती — श्रीमंत मानी स्त्री. ४ सुमति — सुशिक्षित कार्यकर्ती. ५ भागीरथी — जुन्या मताची प्रौढ स्त्री. ]

[ स्वयंसेविका राष्ट्रदेवतेला अभिवादन करीत गाणें म्हणतात. ]

[ चाल — माझा राजबन्सी राणा ]

**वंदूं राष्ट्र–देवतेला । जी स्फूर्ति दे अम्हांला ॥ ध्रु० ॥**

**समाज–सेवा–कार्य कितितरी**
**दिसत नेत्र–कमलां ॥ १ ॥**

**राष्ट्रोद्धारचि प्रश्न बिकट हा**
**पडत आज सकलां ॥ २ ॥**

**ऐक्य करुनियां कार्य करावें**
**सुलभ पंथ गमला ॥ ३ ॥**

**प्रभावती :** ही राष्ट्रदेवता आम्हां स्त्रियांना व आमच्या ह्या देशबांधवांना राष्ट्रकार्याकरितां स्फूर्ति देवो !

**शीलवती :** आपल्या बोलावण्याला मान देऊन आज इतक्या स्त्रिया इथं उपस्थित झाल्या आहेत, हें त्यांच्यांत विचारजागृति झाल्याचंच लक्षण आहे. आतां त्यांच्या हातून कांहीं कार्यही होईल अशी आपण आशा करूं या. पाहा वासंती, सुमति, भागीरथी ह्या सगळ्या मोठमोठ्या स्त्रिया इथें उपस्थित आहेत.

**वासंती :** होय, आम्हांला आपल्या कार्याबद्दल सहानुभूति नि प्रेम वाटत आहे. पण आज आपण मुद्दाम आम्हांला बोलावलं त्याचा हेतु काय बरं ?

**प्रभावती :** म्हटलं एकत्र बसून समाज-सेवेविषयीं चर्चा करावी. एवढा साधाच उद्देश आजच्या सभेचा आहे. आपल्याला सभेचे शिष्टाचार नको आहेत. विचार-विनिमय होऊन कार्य झालं म्हणजे झालं.

**सुमति :** खरंच, हें आम्हांला अगदीं पसंत आहे. उगाच मोठमोठ्या सभा आणि मोठमोठीं भाषणं करायचीं नि शेवटीं कार्यभाग कांहीं नाहीं, असं कधींही नसावं !

**भागीरथी :** होय, पण चर्चा तरी कसली ! मी आतां अगदीं स्पष्टच बोलत्यें ! भलभलत्या सुधारणा अगदीं आम्हांला नापसंत आहेत.

**सुमति :** होय, पण बोलणं तर ऐकून घ्याल कीं नाहीं ? उगाच वितंडवाद कशाला ?

**भागीरथी :** काय प्रभावतीबाई, आपणच आतां पूर्वपक्ष केला पाहिजे.

**प्रभावती :** हं, मी आतां छोटंसं भाषणच करणार आहें. स्त्रियांनीं आपली जुनी दृष्टि आतां टाकली पाहिजे. स्त्रियांचं कार्यक्षेत्र 'चूल व मूल' हें जरी मानलं, तरी त्यांनीं समाज-सेवा ही दृष्टि ठेवलीच पाहिजे; कारण त्या जशा कुटुंबाच्या घटक आहेत तशा राष्ट्राच्याही आहेत.

**सुमति :** पण कुटुंब-सेवा करतांना राष्ट्र-सेवा होत नाहीं का ?

**प्रभावती :** होते, पण कांहीं कार्यं सामाजिक स्वरूपाचीं असतात; तेव्हां कौटुंबिक कार्याबरोबर तिकडेही लक्ष दिलं पाहिजे असं माझं म्हणणं आहे. आतां हें नीट लक्षांत यावं म्हणून मी एक उदाहरणच सांगतें :

साधी आणि नित्याच्या व्यवहारांतली गोष्ट म्हणजे शिक्षण. प्रत्येकानं आपल्या मुलांना घरींच शिक्षण द्यायचं मनांत आणलं, तर तें थोडक्या खर्चांत आणि सर्वांगसुंदर होईल का? कधींही होणार नाहीं.

त्याच्याकरतां शाळा, उच्च शाळा, विश्वविद्यालयें हीं संघटित स्वरूपानंच चालवावीं लागतात व त्याकरतां त्यांत पडणाऱ्या कित्येक व्यक्तींना स्वार्थत्याग करावा लागतो; तीच गोष्ट स्त्रियांकरतां चालवाव्या लागणाऱ्या लहान लहान संस्थांची. स्त्रियांकरतां वाचनालय, उद्योगमंदिर, चर्चामंडळ, शुश्रूषापथक इत्यादि संस्थांची, खेड्यांतही लोकजागृतीच्या दृष्टीनं जरूरी नाहीं असं कोण म्हणेल?

**भागीरथी** : प्रभावतीबाई, अग, आम्ही कुठं नाहीं म्हणून म्हणतों? पण असं झाल्यानं आमची जुनी आर्यसंस्कृति बुडत चालली नि सुधारणा बोकाळली त्याची वाट काय? इश्श! आमच्या लहानपणीं मुली नव्हत्या बाई अशीं थेरं करीत! आतां पाहत्यें, तों घेतलीं पुस्तकं आणि धावल्या इंग्रजी शाळेंत!! काय बाई तरी हें!

**वासंती** : होय, प्रभावतीबाई, ह्यांच्या म्हणण्याचा सुद्धा विचार झाला पाहिजे. आम्हां श्रीमंतांना तर खरोखर दुहेरी पेंचच पडला आहे. इकडे मुली न शिकवाव्या तर त्या सुशिक्षित नि थोर घराण्यांत पडाव्या कशा ही काळजी आणि शिकवाव्या तर आमच्या जुन्या सनातनी वृत्तीला त्यामुळं धक्का बसतो.

**प्रभावती** : पण त्यामुळं कांहीं शिक्षण वाईट असं ठरत नाहीं! शिक्षण हें केव्हांही चांगलंच आहे! त्याचा सदुपयोग करण्याइतकं शील चांगलं असलं म्हणजे झालं नि तें तसं राखणं हें सर्वस्वीं मातांच्या, भगिनींच्या गृहशिक्षणावर नि समाजशिक्षणावरच अवलंबून राहाणार. अलीकडे शाळांमध्यें बहुतेक बौद्धिक शिक्षणाला प्राधान्य दिलं जातं. म्हणून मी म्हणत्यें कीं, शालेय शिक्षणाला पूरक म्हणून प्रौढ

स्त्रियांना शिक्षण देणाऱ्या व त्यांच्यांत विचारजागृति करणाऱ्या भिन्न भिन्न संस्था खेड्यांत व शहरांत पाहिजेत.

**शीलवती :** आमच्या प्रभावतीबाईंचं म्हणणं खरोखरच आपणांस पटत असेल, तर आपल्या इथं स्त्रियांना उपयुक्त अशी एखादी संस्था निघालीच पाहिजे, नि असं करणं अशक्य नाहीं. ( वासंतीकडे पाहून ) श्रीमंतांनीं आपल्या धनाचा त्याग व सुशिक्षितांनीं आपल्या विद्येचा त्याग केल्यास अशी संस्था चालणं अशक्य होईल का ? काय वासंती, आपण कांहींच बोलत नाहीं. आम्हां स्वयंसेविकांवर रागावूं नका, बरं का ?

**वासंती :** आपलं म्हणणं आम्हांला अगदीं पटलं आहे आणि आपल्या सत्कार्याला अल्पशी मदत म्हणून मी आज माझ्या हातांतील ही सोन्याची सुंदर बांगडीच नजर करीत आहें !

**सुमति :** खरंच, आमच्यासारख्या गरीब माणसांनीं काय द्यावं ? पण मी आपल्या अल्पज्ञानाचा व कलाकसुरीचा विनियोग विनावेतन ह्या कार्याकडे करीन.

**भागीरथी :** मला ह्यांत काय करतां येणार ? पण आपण सांगाल तें काम मात्र मी उठवीन. जुनीं माणसं कामाला खबरदार असतात, बरं का !

**शीलवती :** मग आतां काय ठरवितां बरं ?

**भागीरथी :** आमच्या प्रभावती ठरवितील तें आम्हां सर्वांना मान्य आहे !

**प्रभावती :** मी म्हणत्यें, ह्या ठिकाणीं ‘ उद्योगमंदिर ’ उघडावं नि त्यांत स्त्रियांना शिवणकाम, विणकाम, भरतकाम, इत्यादि कलाकसुरीचीं कामं सहकारितेनं शिकवावीं.

**वासंती :** आम्हां सर्वांना ही गोष्ट मान्य आहे.

**प्रभावती :** ह्याच मुहूर्तावर तें उघडण्याची मी व्यवस्था करत्यें. ‘ शुभस्य शीघ्रं ’ अशी एक म्हण आहे, तेव्हां चांगलं कार्य ताबडतोब झालं पाहिजे.

**वासंती :** ‘उद्योगमंदिर’ स्थापण्याची कल्पना कितीतरी चांगली आहे.

**प्रभावती :** आणि अशा कल्पनेला आपण सर्वांनीं मान्यता दिली, ह्याबद्दल मी खरोखरच आपली आभारी आहें. ज्या राष्ट्रांत स्त्री आणि पुरुष अव्याहत उद्योगांत राहातात तेंच राष्ट्र भरभराटीला येतं.

### उद्यम – महिमा

[ चाल : सखे मी मुरारी ]

**जगीं मान मोठा मिळे उद्यमा ॥**
**भजे जो तया, त्या गती उत्तमा ॥ ध्रु० ॥**
**दिसे राष्ट्र जें लोकिं या उन्नत**
**तया उद्यमाची असे संगत**
**म्हणोनी भजा याच कल्पद्रुमा ॥ १ ॥**

(‘बरें तर’ असें म्हणून ‘उद्योगमंदिर’ उघडण्याच्या व्यवस्थेकरतां प्रभावती जाते; तिच्या मागून शीलवती जाते.)

**भागीरथी :** खरंच बाई, ह्या स्वयंसेविकांनीं शेवटीं आपल्यावर जय मिळविला; मला वाटलं होतं, मीच ह्यांची सभा उधळून लावीन, पण ह्यांनीं मलाच कीं हो उधळून लाविली !

**वासंती :** आपण कबूल केल्याप्रमाणं आतां त्यांच्या कार्यांत आपल्याला मदतच केली पाहिजे. पण खरोखरच सुमति, ह्यांना पाहून मला तर श्रीमंतीपेक्षां विद्या आणि समाजसेवा हींच अधिक श्रेष्ठ वाटूं लागलीं आहेत; खरं सुख समाज–सेवेंत आहे ह्यांत शंका नाहीं.

[ चाल : भूल कशी पडली ]

**सौख्य गमे जगतीं । आम्हांतें ॥**
**धन–मानाच्या विलासांत तें ॥ ध्रु० ॥**
**सौख्य खरें परि**
**वाटे अंतरीं**
**समाज–सेवा–रत–सुजनांतें ॥ १ ॥**

**सुमति :** चला तर आपण ह्यांनाच मदत करायला जाऊं या. त्यांतच आपल्यालाही आनंद होईल.

सर्व जातात. ]

---

## प्रवेश दुसरा

( स्थळ : उद्योगमंदिर. १ प्रभावती – चरखा फिरवीत आहे. २ शीलवती-भरतकाम करीत आहे. ३ सुमति – विणकाम, निटिंगवर्क करीत आहे. ४ वासंती – चरख्याची माहिती घेत जवळ बसली आहे. ५ भागीरथी – कापूस पिंजून देत आहे व अन्य स्त्रिया त्या शिक्षणाचा लाभ घेत आहेत. )

**प्रभावती :** ( चरखा फिरवीत गाणें.म्हणते व सूत काढते. )

### चरखा – गीत

[ चाल : चल ये सजणे गुंफूं हार ]

**फिरवा चरखा हा गुलजार ॥ स्वजनांनो !**
**गरगर गरगर चरखा चाले**
**गरिबां पोटा हा देणार ॥ स्वजनांनो !**
**हा करी, कृषिक–अंतरीं, प्रेरणा खरी**
**माय–भू हाच क्षणीं उद्धरी ॥ स्वजनांनो !**
**चालत चालत हा जणुं बोलत**
**राष्ट्र हालविणार**
**जग हें चाले, पुढें चाललें**
**स्वस्थ कसे बसणार**
**निजराष्ट्राची उन्नति करुनी**
**मिळवा विजय अहा ! ऽ ऽ ऽ**
**स्वतंत्रतचा हा मंदार ॥ स्वजनांनो ! ॥ १ ॥**

**वासंती :** अहाहा! चरख्याचा मञ्जुळ ध्वनि तानसेनाच्या मञ्जुळ तानेहून अधिक मञ्जुळ लागतो असं महात्मा गांधी नाहीं का म्हणत! कारण त्यांत गरीब शेतकऱ्यांचं गोड हृदय–संगीत सांठवलेलं आहे! आमच्या खेड्यांत कितीतरी रिकामा वेळ असतो, शेतकऱ्यांच्या गरीब बायकांना सूत काढायला शिकवलं नि खादीची निपज केली, तर त्यांना हा दुय्यम धंदा नाहीं का होणार?

**प्रभावती :** हाच तर 'उद्योगमंदिर' उघडण्याचा प्रधान हेतु आहे. गोरगरिबांना दुय्यम धंद्याचं शिक्षण आपण लवकरच ह्या मंदिरांत देण्याची व्यवस्था करूं.

**शीलवती :** हें भरतकाम कसं काय वाटतं तुम्हांला?

**सुमति :** हीं कामं सुद्धा सुखवस्तु लोकांना हौसेनें करतां येण्यासारखीं आणि गरिबांनीं पोटाकरतां करण्यासारखीं आहेत.

**प्रभावती :** अशा शिक्षणानें कला-विकासही होतो. आपल्या ह्या भरत-खंडांत कलाकुसरीचीं कामं किती तरी होत असत. परंतु अलीकडे हातानें काम करायचं म्हणजे ज्याला त्याला जड वाटतं. आज आपण ह्या मंगल दिवशीं 'उद्योगमंदिरा'चा अनावरणसमारंभ केला हें योग्यच झालं. आतां आपण ह्यापुढें अशाच समाज-सेवा-कार्याला वाहून घेऊं या. त्यांतच आपल्याला खरं सुख होईल नि आपल्या राष्ट्राचीही भरभराट होईल. आतां आपण सर्वांनीं त्या दयाघन प्रभूला वंदन करून त्याची कृपा अखंड राहो अशी प्रार्थना करूं या :

[ चाल : हासवि, नाचवि हृदयाला ]

**वंदन वंदन हें प्रभुला ॥**
**देवो सद्यश कार्याला ॥ ध्रु० ॥**
**समाज–सेवा–रत व्हाया**
**द्यावें आयुर्बल सदया**
**तूंच एक या जगतीं माता**
**आनंदी ठेवीं या सकलां ॥ १ ॥**

## —१४—

# वीरवर तानाजी

[ **स्थळ :** शिवाजीचा राजमहाल. शिवाजी विचार करीत बसला आहे; इतक्यांत तानाजी रायबासह प्रवेश करतो. ]

**तानाजी :** ( लवून मुजरा करीत ) महाराज, आपल्या आज्ञेप्रमाणें एकजात हजार निवडक मावळे घेऊन आलोंय् बघा.

**शिवाजी :** काय तान्या ! आलास वाटतं ? ( शिवाजी उठतो त्याला आलिंगन देतो. )

**तानाजी :** हें काय ? आपलं हृदय इतकं कां बरं भरून आलं ?

**शिवाजी :** तान्या, तुला आपल्या प्रिय रायबाच्या लग्नाचा विचार सोडून रणभूमीवर जाण्यास तयार असलेला पाहून माझं हृदय कां बरं भरून येणार नाहीं ? पण आपल्या मासाहेबांचा हट्ट दिसला नि तो मला पटलाही. शत्रूला इतका नजीक राहूं देण्यांत कधींही सुरक्षितपणा नसतो. हा कोंडाणा किती अवघड आहे, उदेभानु सरदार किती कावेबाज, धोरणी नि पराक्रमी आहे आणि प्रसंग किती बिकट आहे हें पाहिलं म्हणजे तुझ्याबरोबर मींही यावं असंच पुनः पुन्हा मला वाटतं आहे झालं !

**रायबा :** ( पुढें येऊन शिवाजीच्या चरणांचें वंदन करतो. ) महाराज !

**शिवाजी :** हं रायबा, ऊठ ! तुझं लगीन राहिलं ना ? असा रुसूं नकोस ! बाबा विजयी होऊन परत आल्यावर मीच येईन बरं का तुझ्यावर मंगलाक्षता टाकायला !

**रायबा :** महाराज, म्हणून नाहीं मी रुसत. आपल्या सेवेपुढें का लगीन अधिक आहे मला ! पण बाबा मला लढाईला नेत नाहींत. तर महाराज, आपण तरी मला जाऊं द्या. महाराजांनीं नको कांहीं यायला ! महाराज, हा जातिवंत मराठा आहे. शत्रूला जेरीस आणील. माझे दंड कसे फुरफुरताहेत. ह्या माझ्या चिमुकल्या तलवारीनें ( तलवार म्यानांतून काढतो. ) त्या शेंदाड शिपायांना हां हां म्हणतां जमीनदोस्त करीन !

**शिवाजी :** ( रायबाला जवळ घेऊन ) रायबा, कसं झालं तरी तूं मराठ्याचा बच्चा आहेस, सिंहाचा छावा आहेस. मला आनंद होतो तुझं शौर्य पाहून ! पण बाळ, तुला नेऊं बरं का? पुन्हा केव्हां तरीं ! असा रुसूं नको ! ( तानाजीकडे पाहून ) आपल्याला निघालंच पाहिजे.

**तानाजी :** माझ्या रायबानें नाहीं का म्हटलं, आपण येऊं नये म्हणून ! आपण जगाचे पोशिंदे आहां, आपण उभारलेल्या ह्या स्वराज्य-संस्थापनेच्या कार्याचा भार आपणांवरच आहे. आपल्या कृपेनें आणि मासाहेबांच्या आशीर्वादानें हा तान्या खास विजयी होईल. सर्व काळजी त्या अंबाभवानीला आहे.

**शिवाजी :** तान्या ! तुझ्या आग्रहापुढें मला बोलवतच नाहीं. तुझ्यासारख्या स्वामिभक्त वीराला माझी अनुज्ञा आहे. तुला स्वतःच्या मुलाच्या लग्नसोहळ्यापेक्षां देशोद्धाराचा सोहळा पाहण्यांत अधिक आनंद होत आहे हें पाहून मला धन्यता वाटते. आणि खरंच आहे—

**पद**

[ चाल : सखे मी मुरारी ]

**जगावें जगीं देशकार्यार्थ तें ॥**
**खरें लोकिं वीरास हें शोभतें ॥ ध्रु० ॥**
**असे व्यर्थ संसार देशापुढें ॥**
**स्वदेशार्थ सोसा सदा सांकडें ॥**
**स्वदेशीं किती प्रेम हें वाटतें ॥ १ ॥**

**तानाजी :** महाराज, आपलं स्वदेशावरील अलोट प्रेमच आमच्या नसानसांत उतरलं आहे. माझ्या आंगांत आतां वीरश्रीचा संचार होत आहे. केव्हां एकदां जाईन आणि त्या कोंडाण्याच्या किल्लेदाराचा—त्या उदेभानूचा—त्या स्वदेशशत्रूचा-त्या आर्यधर्मविध्वंसकाचा सूड घेईन असं झालं आहे ! ( वीरासन घालून वंदन करतो, शिवाजी डोक्यावर हात ठेवतो. )

**शिवाजी :** या, विजयी व्हा ! त्या अंबाभवानीच्या कृपेनें ह्या मराठे वीरांनाच विजयश्री माळ घालणार ! जातांना मासाहेबांचा आशीर्वाद घेऊन जा म्हणजे झालं.

**तानाजी :** मासाहेबांचा आशीर्वाद घेण्यास केव्हांच चुकणार नाहीं. (इतक्यांत रायबा येऊन मिठी मारतो.) रायबा, आतां येण्याचा हट्ट करायचा नाहीं बरं का ! ह्या महाराजांच्या चरणांची सेवा करीत इथेंच राहायचं म्हटलं ? (महाराजांच्या चरणांवर त्याला घालतो, कंठ भरून येतो.)

**शिवाजी :** हं तान्या, तुला ह्या रायबाची अगदीं काळजी नको. हा माझाच आहे असं मी समजतों. (रायबाच्या पाठीवरून हात फिरवतो.) पण तुझी मात्र हुरहुर माझ्या मनाला सारखी लागली आहे. ये तान्या, एकदा आपण लहानपणीं जसे वारंवार एकमेकांना भेटलों तसेच भेटूं या. (तानाजीला आलिंगन देतो.)

**तानाजी :** महाराज, हें काय ? आज आपणांला असं एकसारखं भरून कां बरं येत आहे ? मी आपणांला धीर तो काय देणार ! पण म्हटलं, हा तान्या–ह्या महाराष्ट्र-देवतेचा लाडका तान्या–महाराजांच्या चरणांवर यशाचं फूल वाहील तरच पुन्हा—

**शिवाजी :** हं ! ये. आतां बोलूं नको. त्या जगदंबेच्या कृपेनें मराठा हा विजयी व्हायचाच. चल, मीही येतों. सैन्याची पाहाणी करून सर्वांना निरोप दिलाच पाहिजे. रायबा, चल.

[ सर्व जातात. ]

## प्रवेश २ रा

[ **स्थळ :** कोंडाणा, तानाजी रणांगणांत पडलेला असून मराठे पळत आहेत, असा प्रवेश. ]

**सूर्याजी :** हं पळतां कुठं ? ज्या दोरानें तुम्ही वर चढून आलांत तो दोर तर केव्हांच तोडून टाकला आहे. ह्या माझ्या तान्यानें पांच-

पंचवीस शत्रूंना लोळवून त्या उदेभानूशीं झुंजत झुंजत रणांगणांत आपला देह ठेवल्यावर तुम्ही शेंदाड शिपायासारखे पळून जाणार होय? धिक्कार! धिक्कार!! (सैनिक उभे राहतात.) नुसते उभे काय राहतां! मागें फिरा, लढा, शत्रूची धूळधाण करा! हा पाहा शेलारमामा, हा आपल्या नंग्या समशेरीनें त्या उदेभानूच्या नरडीचा घोंट घ्यायला धावतो आहे! त्याच्या वयाकडे पहा! त्याच्या वीरश्रीकडे पहा. धन्य, धन्य आहे तुमची !! (जातो.)

## प्रवेश ३ रा

[ कांहीं मावळ्यांसह सूर्याजी पुन्हा प्रवेश करतो. ]

**सूर्याजी :** शाबास, शाबास, मावळे वीरांनो! धन्य आहां! शेलारमामानें त्या उदेभानूला तर यमलोकाला पाठविलाच, पण तुम्हींही आज लढाईत पराक्रम करून मराठ्यांचं ब्रीद राखलंत! आज ह्या कोंडाणा किल्ल्यावर भगवा झेंडा फडकविलात! शाबास! शाबास! बोला, शिवाजीमहाराज की जय!! (त्रिवार)

## — १५ —

## बेकार

[ **स्थळ :** जयवंताचें घर, जयवंत व चंदुलाल गप्पा मारीत आहेत. ]

**जयवंत :** अरे चंदू, मला बी. एस्‌सी. होऊन एक वर्ष होत आलं. सर्व्हिसकरितां ॲप्लिकेशन्स लिहितां लिहितां हाताला घट्टे पडले, ऑफिस, फर्म, कंपनी ह्यांमधून खेटे घालतां घालतां पायांना चांगलीच रग लागूं लागली; ह्यामुळें आतां मात्र मला नको ती नोकरी असंच वाटूं लागलं आहे.

**चंदुलाल :** अरे, असा निराश होऊं नकोस; एवढा शिकला-सवरलेला तूं, तुला काय कमी आहे ? म्हणशील तें करूं शकशील.

**जयवंत :** होय तें खरं आहे. एवढा आत्मविश्वास परमेश्वरानें मला दिला तर आनंदच होईल.

[ इतक्यांत पोस्टमन येतो व चारपांच लखोटे आणि पत्रें जयवंताच्या हातांत देतो आणि जातो. ]

**चंदुलाल :** समथिंग होपफुल्‌ !

**जयवंत :** ( भराभर लखोटे फोडतो व वाचतो. ) अरे, कसली आशा. एकदम निराशा. 'नो व्हेकन्सी' ह्या ठराविक सांच्याचीं उत्तरं आहेत बघ !

**चंदुलाल :** ( चहाचा कप हातांत घेऊन ) अरे, चहा निवत चालला. निराश जीवांना आशावादी करणारा, श्रीमंतांना तरतरी देणारा आणि बेकार तरुणांना क्षणभर आपल्या वेदना विसरायला लावणारा ह्या चहाशिवाय कोण बरं मित्र आहे ?

**जयवंत :** ( चहा घेत घेत ) खरंच, मी तर ह्यावरच आजकाल जगत आहें.

### पद

[ चाल : हे प्रभो विभो... ]

**हा चहा अहा ! पहा किती हा न्यारा**
**जगतांत मित्र हा प्यारा ऽ ऽ ॥ ध्रु० ॥**

**तरतरी देइ तरुणांना**
**विसरवी वेदना नाना**
**बेकार अशा जीवांना**
**याविना मित्र नच दुसरा ऽ ऽ ऽ ॥ १ ॥**

**चंदुलाल :** अरे दुसरा मित्र नसला तर मैत्रीण आहे ना? त्याच्या जोडीला ही सिगरेट असली (पॅकेट बाहेर काढतो) तरच खरा रंग येतो. अरे, ह्या सिगरेट-सेवनांत जगांतील अखिल दुःखं विलीन होऊन जायचीं!

**जयवंत :** चहा क्षम्य आहे, पण सिगरेट-सेवन मला मुळींच आवडत नाहीं हें तुला ठाऊकच आहे. माझे बाबा तर कट्टे विरुद्ध आहेत. तूंच सांग पाहूं, अशा कृत्रिम उपायांनीं का माझ्या बेकारीच्या वेदना कायमच्या नाहींशा होणार आहेत? तूं श्रीमंत आहेस नि साहसीही आहेस, त्यामुळें तुझं सगळं निभतं. पण माझ्यासारख्या मध्यम स्थितींतील तरुणानें काय करावं? कांहीं तरी कर म्हणून बाबा सारखे माझ्या पाठीमागें लागले आहेत. आज जर हीं आलेलीं उत्तरं त्यांना दाखवलीं तर निराशेनं त्यांच्या-गरिबीनें आणि संकटांनीं हळुवार झालेल्या-हृदयाला मोठाच धक्का बसेल. काय करावं? ते आतां बाहेरून येतील आणि हाच प्रश्न मला विचारतील.

**चंदुलाल :** बाबांचं नांव काढतांच माझं हें पॅकेट खिशांत चाललं बघ! त्यांना पाहिलं म्हणजे किती पूज्य भावना उत्पन्न होतात बरं! मला वाटतं, तूर्त त्यांना ' अंडर कन्सिडरेशन ' म्हणून ठोकून दे झालं. म्हणजे आतांच निराशा नको!

**जयवंत :** अशी थापबाजी किती दिवस चालणार?

[ इतक्यांत जयवंताचे बाबा येतात. ]

**बाबा :** काय जयवंत, काय पुन्हा पुन्हा तेंच तेंच विचारायचं? झालं तरी काय तुझ्या अर्जांचं?

**जयवंत :** बाबा, आशेचा किरण नाहीं, मी आज थोडे क
करतों आहें ? वर्षभर माझ्या प्रयत्नांत कसूर का आहे ?

**बाबा :** प्रयत्नांत कसूर नाहीं, पण फलनिष्पत्ति काय आहे ?
तर आज अगदीं डोकं चढलं आहे ! त्या धनजीशेटकडून एक हे
रुपये शिक्षणाकरितां काढले, त्यांतील कपर्दिक तरी परत गेली आहे कां
बरं, तें असो; पण नोकरीची आशा धरून निरुद्योगी बसायचं तें
किती ! हं. हे चहाचे पेले दिसताहेत ! चंदुलालला चहा देऊं नको
असं माझं म्हणणं नाहीं, पण ह्या तरुणांना चहा, चिवडा व चिरूट
ह्यांच्या नादानें अगदीं नादान करून टाकलं आहे बघा !

**चंदुलाल :** बाबा, असं कसं म्हणतां ? गरम चहानें तरतरी येते,
खमंग चिवड्यानें स्वभावांत खमंगपणा वाढतो, चिरूटानें तर चिंतानाश
होतो, हें तरुणांचं मत अगदींच अग्राह्य कसं म्हणतां येईल ? ह
त्रिकुटामुळेंच हल्लींच्या तरुणांना इतके मानसिक श्रम सहन करण्य
सामर्थ्य निर्माण झालं आहे.

**बाबा :** शाबास, शाबास चंदू ! तूं केलेलं वर्णन अगदीं अक्षरशः
खरं आहे. पण लक्षांत ठेव कीं, चहाची तरतरी क्षणभर, चिवडा तर
शरीराचा चिवडाच करतो, आणि चिरूटच्या धुरानें शरीराची धुळधाणच
व्हायची ! तरुणांच्या नसानसांत जोम उत्पन्न करणारे का हे पदार्थ
आहेत ? जर मर्दपणा ह्यांनीं उत्पन्न होत असता, तर सगळ्याच
तालीमबाज लोकांनीं हा खुराक सुरू केला असता ! हे सगळे चोचले
आहेत तरुणांचे, झालं ! आतां आमच्या ह्या जयवंताचाच प्रश्न पहा !
का आहे त्याला ईर्षा, का अभिमान, का कर्तृत्व ? धाडस आणि
व्यवहारदृष्टि कधीं येतील तेव्हां येतील !

**जयवंत :** असं कसं म्हणतां बाबा, तुम्ही सांगाल तें करायला मी
तयार आहें.

**बाबा :** म्हणजे तसा तूं अगदींच शेळपट आहेस असं माझं म्हणणं ; पण तरुणपणाचा जोम हल्लींच्या तरुणांत क्वचितच आढळतो! ...चीं कारणं अनेक आहेत.

**जयवंत :** सांगाल तें करावयाला तयार आहें म्हणतों ना? तुमची आज्ञा शिरसामान्य!

**बाबा :** अरे, हेंच तर मी म्हणतों. स्वतंत्र बुद्धि नाहीं. आमचे जरी ने. ...ींत दिवस गेले असले, तरी तूं स्वतंत्र नागरिक व्हावेंस असं का आम्हांला वाटत नाहीं? स्वातंत्र्याशिवाय ह्या जगांत श्रेष्ठ काय आहे?

**जयवंत :** आपल्या पावलावर पाऊल टाकूनच वागत आहें ना मी, बाबा?

**बाबा :** तें अगदीं अक्षरशः खरं आहे. अरे, आमचा जन्म अगदीं चाकरीच्या चाकोरींत गेला, आम्हीं मानापमान गिळले, जरा मर्जी कमी झाल्यावर आयरिश प्रमोशन घेतलं, स्वाभिमानाची होळी केली; पण तूंही त्याच मार्गानें जावेंस असं मला अंतःकरणापासून वाटत नाहीं. तुझ्यांत जर कर्तृत्व असेल, तर माझी पूर्ण परवानगी आहे वाटेल तो स्वतंत्र मार्ग आंखायला!

**जयवंत :** ठीक, मलाही कांहींतरी स्वतंत्र धंदाच करावा असं वाटूं लागलं आहे. हे पहा पांच अर्ज, त्यांवर कशीं ठराविक उत्तरं आलेलीं आहेत तीं!

**बाबा :** ( क्षणभर वाचतात व रागानें ) हं! 'नो व्हेकन्सी!' ( हातानें टर टर फाडीत) जा स्वर्गांत जा, ह्या मर्दपणाच्या साम्राज्यांत ह्यापुढें तुम्हांला जगणं शक्य नाहीं.

**जयवंत :** बाबा, स्वतंत्र धंदा म्हटला म्हणजे भांडवल, त्याचं काय?

**बाबा :** (अगदीं स्तिमित होऊन शून्य दृष्टीनें पाहात ) हेंच हेंच दारिद्र्य, ज्यानें माझ्या जीवनांत माझे पाय मागें ओढले, ज्यानें आज लाखों

देशबांधवांना शिक्षणाशिवाय राहावं लागत आहे, अन्नाशिवाय अर्धपोटींच राबावं लागत आहे आणि स्वाभिमान नि सुख ह्यांवांचून ज[illegible] लागत आहे. ( जरा विचार करून ) हं आठवलं, तुझ्या आईच्या अंगाव[illegible] दागिने आतां भांडवल.

**जयवंत :** बाबा, असं नका करूं. मी 'भांडवलाशिवाय धंद[illegible] उभारीन, अगदीं धीर सोडूं नका. आतां जगांत मला कोणत्याही साधनाची गरज नाहीं. मी आणि माझं खंबीर मन !

**चंदुलाल :** हं बाबा, माझे बाबा शिक्षण घेत असतांनाच वारले. इंटरमधूनच मला शिक्षणाला राम राम ठोकावा लागला. पण आपण अत्यंत चिकाटीनें आपल्या मुलाला शिकविलं नि मी केवळ त्याचा स्नेही म्हणून आपण आजवर आपल्या गरिबींत सुद्धा माझं मन कधींही दुखविलं नाहीं, इतकंच नव्हे तर केव्हांही मी इथें आलों असतां आपण आपल्या मुलाप्रमाणें मला वागविलं, तेव्हां मी जयवंत म्हणेल तितकं भांडवल धंद्यांत घालायला तयार आहें !

**बाबा :** चंदुलाल, तुझ्या ह्या कृतज्ञतेबद्दल काय बोलावं हेंच मला सुचत नाहीं. मीं जयवंताला शिक्षण दिलं आहे, माझ्या विचारांची दिशा त्याला समजली आहे, आतां तुम्ही दोघेही काय पाहिजे तें ठरवा. तुम्ही तरुण आहां, बेकारीचा प्रश्न कसा काय सोडवितां हेंच मी पाहणार आहें. हा प्रश्न तुमच्या पुढेंच उभा नसून अखिल राष्ट्रापुढें तो उभा आहे. बरं जातों मी आतां ! ( निघून जातात. )

**जयवंत :** पाहिलस कसं जुनं हाड आहे तें ! बाबा दिसतात तसे नाहींत; त्यांचे विचार तरुणांना लाज आणतील इतके ओजस्वी आणि जोमदार आहेत. मग काय ?

**चंदुलाल :** आतां आपणांला मार्ग आंखलाच पाहिजे. कॉलेजांतील चैनीच्या व सुखसाधनांच्या संवयी आपणांस सोडल्याच पाहिजेत,

बेकारीचा प्रश्न सोडविण्याकरितां धैर्यानें धाडसाचा धडा घेतलाच जे. तूं बी. एस्सी. असल्यामुळें तुझा शास्त्रीय विषय हातखंडा हे. त्या अनुरोधानें आपणांस स्वतंत्र धंद्याचा काय मार्ग आंखतां इल तें पाहूं !

**जयवंत :** पण बेकारीला स्वतंत्र धंदा काढूनच तोंड द्यायचं हा मात्र निश्चय कायम झाला बरं, चंदुलाल ! आतां उशीरच झालेला आहे, चल तर, बाबा वाट पाहात असतील !

[ जातात. ]

## प्रवेश २ रा

[ **स्थळ :** जयवंताच्या कारखान्यांतील एक विभाग, चंदुलाल व जयवंत बोलत आहेत असा प्रवेश. ]

**चंदुलाल :** काळ किती भराभर जात असतो. आपण स्वतंत्र धंदाच करायचा असं ठरविल्याला तीन वर्षं होऊन गेलीं. एवढ्या अवधींत आपल्या जीवनांत किती क्रांति झालेली आहे.

**जयवंत :** क्रांति ह्यांत शंकाच नाहीं, चंदू ! माझं अमेरिका आणि जपान इथें शिक्षणाकरितां जाणं, इथें आल्यावर 'वंडरफुल केमिकल वर्क्स' हा कारखाना काढणं आणि आज निधड्या छातीनें बेकारीचा प्रश्न सोडविण्याकरितां चळवळ करण्यास पुढें येणं, ह्या गोष्टी स्वप्नांत तरी संभवनीय होत्या का ? पण तूं आपली इस्टेट पणाला लावलीस आणि शब्द राखलास म्हणूनच ह्या गोष्टी संभवनीय झाल्या, दुसरं काय ?

**चंदुलाल :** पण आतां मला त्याचं कांहींच वाटत नाहीं ! आपला कारखाना किती चांगला चालला आहे. मला तुझ्या बुद्धिमत्तेचं, धैर्याचं आणि कलानैपुण्याचं राहून राहून आश्चर्य वाटतं.

**जयवंत :** अजून सगळं आहे तें पुढेंच आहे, चंदू ! अ
बेकारीच्या प्रश्नासंबंधानें बोलावलेली सभा यशस्वी करणं म्हणजे पय
आपल्यावरील जबाबदारी वाढविण्यासारखं आहे.

**चंदुलाल :** त्याची मला कल्पना आहे. परंतु एकदा ध्येयव
पतकरला व तदनुसार देशसेवेचं खडतर व्रत अंगिकारलं म्हण
जबाबदारी ही ठेवलेलीच.

**जयवंत :** ( घड्याळ पाहून ) हं आतां बोलत बसण्यांत अर्थ नाहीं. सभेची वेळ झाली. आतां निघालंच पाहिजे.

[ जातात. ]

## प्रवेश ३ रा

[ **स्थळ :** सभास्थान. सभेच्या पद्धतीप्रमाणें सर्व व्यवस्थित बसलेले आहेत. इतक्यांत जयवंत व चंदुलाल प्रवेश करितात. सर्व त्यांना उत्थापन देऊन टाळ्यांच्या कडकडाटांत त्यांचें स्वागत करतात. ]

**जयवंत :** वेळ झाली. सभेच्या कार्यक्रमाला सुरुवात करावी हेंच योग्य.

**अण्णासाहेब :** ठीक आहे. आपण ठरविल्याप्रमाणें कार्यक्रम होईल. मालतीबाई, मुलींचं ईशस्तवन होऊं द्या बरं !

**मालती :** ( मुलींना उद्देशून ) 'करुणा प्रभो ! कां ये ना।' हें पद म्हणा बरं ! मी पेटी वाजवित्यें.

( मालती पेटी वाजविते व मुली पुढील पद म्हणतात. )

### पद

[ चाल : रमला कुठें ग कान्हा– ]

**करुणा प्रभो ! कां ये ना ॥**
**काधिं करिशी राष्ट्रोद्धरणा ॥ ध्रु० ॥**
**प्रिय आमुची भारत–माय**
**करिते ही आतां हाय !**
**तारी तिला प्रभुराय !**
**आमुचा तूं प्रेमळ राणा ॥ १ ॥**

**बेकारी दारुण झाली**
**अन्नान्नदशा ही आली**
**धावे प्रभो ! वनमाली**
**दाखवी मार्ग स्वजनांना ॥ २ ॥**

[ वंदन करून बसतात. ]

**अण्णासाहेब :** मी प्रेमानें सर्वांचं स्वागत करतों. आजच्या सभेचं अध्यक्षस्थान येथील 'वंडरफुल केमिकल वर्क्स' चे मॅनेजर श्रीयुत चंदुलाल ह्यांनीं स्वीकारावं अशी मी सूचना करतों. त्यांनीं आपल्या उदार धोरणानें येथील औद्योगिक जीवनांत क्रांति घडवून आणलेली आहे हें निःसंशय !

**धनंजय :** माझं त्याला अनुमोदन आहे.

**चंदुलाल :** आपण मला अध्यक्षस्थान दिलं, ह्यांत आपल्या मनाचा मोठेपणा व्यक्त होत आहे. वास्तविक माझ्यापेक्षां वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध असे कितीतरी सभ्य स्त्री-पुरुष इथें उपस्थित आहेत, तथापि आपली सूचना म्हणून मी ह्याचा स्वीकार करतों व सर्वांच्या सहानुभूतीनें आजचं कार्य यशस्वी व्हावं असं इच्छितों. ( अध्यक्षांकरितां असलेल्या खुर्चीवर बसतो. पुन्हा उठून .)

आजच्या सभेचा मुख्य हेतु आपल्या देशांत जी वाढती बेकारी आहे, तिला आळा कसा घालतां येईल ह्याचा विचार करणें हा आहे व त्यासंबंधीं आपल्या येथील तरुण व उत्साही कार्यकर्ते श्रीयुत जयवंतराव हे भाषण करणार आहेत, तेव्हां त्यांना आपलं भाषण करण्याविषयीं मी विनंती करतों.

**जयवंत :** अध्यक्षमहाराज व सभाजन हो ! आपल्या देशांत बेकारी दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत आहे हें पाहून माझं हृदय तुटतं ! ह्या महत्त्वाच्या प्रश्नाकडे देशांतील पुढाऱ्यांचं लक्ष वेधत आहे ही आनंदाची

गोष्ट आहे. परंतु जर हा प्रश्न आपण तत्काळ सोडविला नाहीं, जगाच्या जीवन-कलहांत आपला निभाव लागणं कठीण होईल. म अल्पमतीप्रमाणें थोडक्यांत कोणत्या गोष्टी विचारांत घेतल्या पाहिजेत मी आतां सांगतों :

आधुनिक शिक्षण एकांगी व सदोष आहे, त्यांत क्रांति झाली पाहिजे वर्धा-शिक्षण-योजनेप्रमाणें कला-मूलक शिक्षण झपाट्यानें सुरू झाल पाहिजे, इतकंच नव्हे, तर वरच्या दर्जाचं शिक्षण देणाऱ्या उद्योग-शाळाही निघाल्या पाहिजेत.

आपणांस ठाऊकच आहे कीं, सध्याच्या परिस्थितींत भांडवल उभं करणं किती कठीण असतं. त्याकरितां 'औद्योगिक पतपेढया' निघून तद्द्वारां अल्प व्याजानें साहसी तरुणांना भांडवलाची तरतूद झाली पाहिजे.

भौतिकशास्त्रविशारदांनीं आपल्या देशाची पाहाणी करून कच्च्या मालाच्या पैदाशीप्रमाणें कुठें कारखाने निघण्यासारखे आहेत त्याचं संशोधन केलें पाहिजे व धंदेवाईक तरुणांना योग्य मार्ग-दर्शन केलं पाहिजे.

सरकारनें सहानुभूतिपूर्वक स्वदेशी उद्योगधंद्यांना उत्तेजन देऊन त्यांच्या अभिवृद्धयर्थ योग्य त्या सवलती दिल्या पाहिजेत व मालाचा उठाव होण्याच्या दृष्टीनें निर्बंध ठरविले पाहिजेत.

हा देश शेतीप्रधान असल्यामुळें विशेषत: आमच्या शेतकरी बांधवांना साक्षर करून त्यांच्यांत कृषिकर्मकौशल्य निर्माण केलं पाहिजे व त्यांना दुय्यम धंदे ( कॉटेज इंडस्ट्रीज ) काढून दिले पाहिजेत.

ह्या आणि अशाच गोष्टींना चालना देण्याचा आम्हीं विचार केला आहे. तेव्हां ह्या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाकडे जनतेनें लक्ष द्यावं एवढीच विनंती करतों व वेळ फार होईल ह्या भीतीनें मी आपली रजा घेतों.

**दुलाल :** बेकारीच्या प्रश्नावर आमचे मित्र जयवंत ह्यांचं विचार-क असं भाषण झालेलं आहे. तेव्हां ह्या प्रश्नाला मूर्तस्वरूप देण्या-तां ' उद्योगप्रसारक मंडळ ' म्हणून संस्था लवकरच स्थापन ण्याचा आमचा हेतु आहे. त्यासंबंधीं अधिक ऊहापोह करण्याकरितां नरल मीटिंग घेण्यांत येईल. आतां आमचे प्रचारक विनोद ह्यांचं मयोचित काव्यगायन होऊन आजच्या सभेचा कार्यक्रम संपणार आहे.

**विनोद :** ( डफावर पुढील गाणें म्हणतो. )

**पद**

[ चाल : मन शुद्ध तुझं... ]

**रण-रंगण हें जगत अखिल; करूनि धिटाई ॥**
**शूर वीर जीवनाची जिंकी लढाई ॥**
**करी थोर चढाई ॥ ध्रु० ॥**
**सोन्यानिं ही फुलवुं फिरुनि भारत–माता ॥**
**जीविताची न करि तमा कधिंही जेता ॥**
**अचल हृदय तरिहि विजय देवचि देई ॥**
**शूर वीर ॥ १ ॥**
**गर्जतसे भरत-भूमि-यशो-दुंदुभी ॥**
**ऐकुनियां धडक भरे शत्रु मनीं भी ॥**
**विजय-गान गात म्हणा भवानी आई ॥**
**शूर वीर ॥ २ ॥**

**धनंजय :** श्रीयुत जयवंत ह्यांच्या उद्बोधक भाषणानें आणि विनोद ह्यांच्या स्फूर्तिदायक गाण्यानें आमच्यांत जागृति झालेली आहे. आम्ही धैर्यानें आणि एकजुटीनें ह्या बेकारीच्या प्रश्नाला तोंड देण्यास सिद्ध आहों. आम्ही ' उद्योगप्रसारक मंडळ ' जें कार्य करील त्यांत सहभागी आहों.

गोष्ट आहे. परंतु जर हा प्रश्न आपण तत्काल सोडविला नाहीं, जगाच्या जीवन-कलहांत आपला निभाव लागणं कठीण होईल. म अल्पमतीप्रमाणें थोडक्यांत कोणत्या गोष्टी विचारांत घेतल्या पाहिजेत मी आतां सांगतों :

आधुनिक शिक्षण एकांगी व सदोष आहे, त्यांत क्रांति झाली पाहिजे वर्धा-शिक्षण-योजनेप्रमाणें कला-मूलक शिक्षण झपाट्यानें सुरू झाल पाहिजे, इतकंच नव्हे, तर वरच्या दर्जाचं शिक्षण देणाऱ्या उद्योग-शाळाही निघाल्या पाहिजेत.

आपणांस ठाऊकच आहे कीं, सध्याच्या परिस्थितींत भांडवल उभं करणं किती कठीण असतं. त्याकरितां ‘ औद्योगिक पतपेढया ’ निघून तद्द्वारां अल्प व्याजानें साहसी तरुणांना भांडवलाची तरतूद झाली पाहिजे.

भौतिकशास्त्रविशारदांनीं आपल्या देशाची पाहाणी करून कच्च्या मालाच्या पैदाशीप्रमाणें कुठें कारखाने निघण्यासारखे आहेत त्याचं संशोधन केलें पाहिजे व धंदेवाईक तरुणांना योग्य मार्ग-दर्शन केलं पाहिजे.

सरकारनें सहानुभूतिपूर्वक स्वदेशी उद्योगधंद्यांना उत्तेजन देऊन त्यांच्या अभिवृद्ध्यर्थ योग्य त्या सवलती दिल्या पाहिजेत व मालाचा उठाव होण्याच्या दृष्टीनें निर्बंध ठरविले पाहिजेत.

हा देश शेतीप्रधान असल्यामुळें विशेषत: आमच्या शेतकरी बांधवांना साक्षर करून त्यांच्यांत कृषिकर्मकौशल्य निर्माण केलं पाहिजे व त्यांना दुय्यम धंदे ( कॉटेज इंडस्ट्रीज ) काढून दिले पाहिजेत.

ह्या आणि अशाच गोष्टींना चालना देण्याचा आम्हीं विचार केला आहे. तेव्हां ह्या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाकडे जनतेनें लक्ष द्यावं एवढीच विनंती करतों व वेळ फार होईल ह्या भीतीनें मी आपली रजा घेतों.

**दुलाल :** बेकारीच्या प्रश्नावर आमचे मित्र जयवंत ह्यांचं विचार-क असं भाषण झालेलं आहे. तेव्हां ह्या प्रश्नाला मूर्तस्वरूप देण्यातां ' उद्योगप्रसारक मंडळ ' म्हणून संस्था लवकरच स्थापन ग्याचा आमचा हेतु आहे. त्यासंबंधीं अधिक ऊहापोह करण्याकरितां नरल मीटिंग घेण्यांत येईल. आतां आमचे प्रचारक विनोद ह्यांचं मयोचित काव्यगायन होऊन आजच्या सभेचा कार्यक्रम संपणार आहे.

**विनोद :** ( डफावर पुढील गाणें म्हणतो. )

### पद

[ चाल : मन शुद्ध तुझं... ]

**रण-रंगण हें जगत अखिल; करूनि धिटाई ॥**
**शूर वीर जीवनाची जिंकी लढाई ॥**
**करी थोर चढाई ॥ ध्रु० ॥**

**सोन्यानिं ही फुलवुं फिरुनि भारत-माता ॥**
**जीविताची न करि तमा कधिंही जेता ॥**
**अचल हृदय तरिहि विजय देवचि देई ॥**
**शूर वीर ॥ १ ॥**

**गर्जतसे भरत-भूमि-यशो-दुंदुभी ॥**
**ऐकुनियां धडक भरे शत्रु मनीं भी ॥**
**विजय-गान गात म्हणा भवानी आई ॥**
**शूर वीर ॥ २ ॥**

**धनंजय :** श्रीयुत जयवंत ह्यांच्या उद्बोधक भाषणानें आणि विनोद ह्यांच्या स्फूर्तिदायक गाण्यानें आमच्यांत जागृति झालेली आहे. आम्ही धैर्यानें आणि एकजुटीनें ह्या बेकारीच्या प्रश्नाला तोंड देण्यास सिद्ध आहों. आम्ही ' उद्योगप्रसारक मंडळ ' जें कार्य करील त्यांत सहभागी आहों.

**चंदुलाल :** आजच्या कार्यक्रमाचा प्रेक्षकांच्या मनावर इष्ट परिणाम झालेला पाहून समाधान वाटतं. आतां समारोपादाखल ए म्हणायचं आहे कीं, बेकारीचं उच्चाटण झाल्याविना—म्हणजे दे स्वतंत्र धनोत्पादक धंद्यांचा भरपूर फैलाव झाल्याविना—आपल्या देशा लोकांना पोटभर अन्न व आंगभर वस्त्र हीं केव्हांही मिळणार नाहीं आणि त्यांची तर जीवनाच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यकता आहे. लोकमा टिळक, महात्मा गांधी इत्यादि पुढाऱ्यांनीं जरी ह्या गोष्टीला चालना दिलेली असली तरी अजूनही हा प्रश्न यशस्वी रीतीनें सोडविला गेलेला नाहीं. तेव्हां ह्या सार्वत्रिक जीवनाच्या भीषण प्रश्नाकडे राष्ट्रधुरीणांनीं अधिक लक्ष दिलं पाहिजे, एवढंच आम्हां तरुणांचं म्हणणं आहे.

आमच्या तरुणांच्या सभेंत आभार-प्रदर्शन इत्यादि औपचारिक गोष्टींना गचांडी देण्यांत येत आहे. केवळ कर्तव्यबुद्धीनें आम्ही इथं जमलों आहों.

तेव्हां सर्वांनीं शेवटीं त्या जगन्नियंत्या प्रभूचं स्तवन करूं या. तो आपल्याला कार्यांत यश देणारा आहे :

## पद

[ चाल : हांसवि नाचवि ]

**या या धावत प्रभुराया ॥**
**देशा अमुच्या ताराया ॥ ध्रु० ॥**
**उद्यमीं आमुची मति रमवी ॥**
**राष्ट्र वैभवें हें नटवी ॥**
**भारत अमुचा प्रिय आम्हांला ॥**
**धन्य जगीं तो करिं रे सदया ॥ १ ॥**

[ 'वंदे मातरम्' च्या त्रिवार जयघोषांत सभा विलीन होते. ]

अभिमान मायभूमीचा उपजवी ।
हें दैन्य तियेचें लोकीं घालवी ।
पावित्र्य बंधु-भगिनींचें वाढवी ।
हा चरखा झाला प्रिय बहु भारतहृदया ॥
निज हिंद-भूमिचें गान गात फिरवूं या ॥ १ ॥

**शांता :** अहाहा ! किती गोड गाणं हें ! चरख्याचं महत्त्व खरोखरच फार आहे ! चरखा हा शेतकऱ्यांचा एक दुय्यम धंदा आहे. महात्मा गांधींचं यश तर ह्या चरख्यावरच अवलंबून आहे. चरख्यानें सूत काढून स्वदेशी कापड तर आपल्याला तयार केलंच पाहिजे; परंत त्याप्रमाणें, मला वाटतं, आपल्या देशांत होणाऱ्या प्रत्येक कच्च्या [illegible] माल तयार करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. [illegible] म्हणजे [illegible]रा प्रत्येक जिन्नस जर आपण आपल्याच देशांत तयार के[illegible] तर आपला पैसा आपल्याजवळच नाहीं का राहाणार ? काय मालतीबाई, हा परदेशी झक्पक् कपडा तुम्हांला कसा बाई आवडतो कुणास ठाऊक ? इश्श, मी तर बाई ह्याला हातही नाहीं लावणार !

**मालती :** आम्ही कांहीं अशिक्षित मुली नाहीं. तुमचे विचार थोडक्यांतच आम्हांला पटले आहेत. आमच्याकडून होईल तेवढा आम्ही स्वदेशी कापडा वापरूं आणि आमची लीला कांहीं माझ्याबाहेर जाणार नाहीं असं मला वाटतं ! काय लीले ?

**लीला :** ताई, मी का तुझ्याबाहेर आहें ! तूं सांगशील तसं मी वागणार ! परंतु मला चांगलीं पातळं मिळतील का ग ?

**कुसुम :** लीले, आपला देशी माल आतां चांगला निघूं लागला आहे. आज सर्वांनींच स्वदेशीचं व्रत आचरण्याचा नियम करावा असं

मी म्हणतें. कवि कामत ह्यांचं स्वदेशी–व्रताचं महत्त्वदर्शक गीत 'किर्लोस्कर' ह्या लोकप्रिय मासिकांत आलेलं आपण नाहीं का म्हणत ?

**लीला :** कुसुम, तें गीत तुझ्या मधुर कंठांतून ऐकण्याची आमची फारच इच्छा आहे.

**कुसुम :** तसं कशाला, आपण सर्वजणींनींच म्हणूं या. सहकारितेशिवाय कोणतं कार्य आहे ?

## पद

[ जाति : केशवकरणी ]

**निज देशाच्या उद्योगाची व्हाया उन्नति खरी**
**स्वदेशीव्रत भावें आचरी ॥**
**मातृ–भूमिचें निजबंधूंचें प्रेम खरें अंतरीं**
**तरी मग व्रत बरवें धरी ॥**
**गरीब बांधव मिळवायातें साधि आजिभाकरी**
**श्रम बहु रात्रंदिन तो करी ॥**
**त्या कष्टानें घर्म–बिंदुनें हृदय द्रवे तव जरी**
**स्वदेशी वस्तु धरी निजकरीं ॥**
**मग पाहुनियां ती सौख्य तुला होतसे ।**
**निजबांधव-प्रेमा त्यामाजी तुज दिसे ।**
**हा आत्मोन्नतिचा पंथ आपणां असे ।**
**गरीब श्रीमंतांच्या हृदयीं एकतानता करी ॥**
**स्वदेशी सकलांतें उद्धरी ॥ १ ॥**

[ मंगलमूर्तीला वंदन करून निघून जातात. ]

## पुष्प - हार - समर्पण

[ चाल : सखे मी मुरारी वनीं पाहिला... ]

अहा ! पुष्पहारास अर्पीत मी ॥
तुम्ही ज्ञान-मार्तंड आम्ही तमीं ॥ ध्रु० ॥
सुगंधी सुमें सुष्टु हीं सुंदर
तसा या मनीं हा वसे आदर
प्रकाशांत न्याया करा ना कमी ॥ १ ॥

## आ भा र — प्र द र्श न

[ चाल : झंपा ]

कितितरी शिशुवरी प्रेम हें आपुलें ॥
म्हणुनियां लाभलीं थोर हीं पाउलें ॥ ध्रु० ॥
आभार नच फिटे
शब्दसिंधु आटे
उभय-हृदयां पटे
धन्य किति वाटलें ॥ १ ॥

## आ भा र

[ राग : पटदीप, ताल : त्रिताल ]

आभार बहु जाहले । आपुले ॥
निजदर्शनानें शिशु तोषवीले ॥ ध्रु० ॥
आम्ही किती सान
द्यावें अम्हां ज्ञान
ठेवा कृपा छान
आम्हांवरी
भवदीय चरणीं । शिशु नम्र झाले ॥ १ ॥

## अंतिम – गीत

[ राग : भैरवी, ताल : विलंबित केरवा ]

सकल भगिनिंना हीच प्रार्थना ॥
प्रभुवर–चरणां वाहावें सुमनां ॥ ध्रु० ॥
उन्नति अपुली संतत करुनी
निशिदिनिं लागा राष्ट्रोद्धरणा ॥ १ ॥

## निरोप – गीत

[ राग : शंकरा, ताल : त्रिताल ]

ऽ ऽ ऽ प्रेमा संतत ठेवा ॥
रसिकांचा हा सुंदर मेवा ॥ ध्रु० ॥
रसिक जनांचा वियोग पाहुनी
खळबळ उडते अंतःकरणीं
भेटूं परि या फिरुनी फिरुनी
गोड कवीची घ्या या सेवा ॥ २ ॥

म. ग्रं. सं. ठाणे. ग्रंथालय
वा. क्र. ६६६०२ नों दि
वि. ग्रा. वा क्र.
अनुक्रम
सुमार क्र.
नों. दि.